# संत कबीर

डॉ. ज्ञानेश्वर तांदळे

संत हे मानवी संस्कृतीला उजाळा देणारे दीपस्तंभ आहेत. साऱ्या जगाला अभिमान वाटावा असे विचारधन त्यांनी निर्माण केले. संतांच्या शब्दामध्ये महान आशय सामावलेला असतो. संत हे खरे विश्वाचे अलंकार आहेत संतांनी मानव समाजाला प्रेमाचा राजमार्ग दाखविला.

संवत १४५५ मध्ये कबीरांचा जन्म झाला. नीरू व नीमा यांनी कबीरांचा सांभाळ केला. लहानपणापासून कबीरांच्या हृदयातून संतत्व प्रकट होत होते. देवपूजेची त्यांना आवड होती. साधुसंतांची सेवा लहानपणापासून करत होते.

बालपणीच कबीरांनी कपडे विणण्याची कला आत्मसात केली. कपडे विकण्याचेही काम ते करत होते. गरीब वैष्णवांना ते मोफत कपडा देत होते. आपल्या कर्मापेक्षा प्रभुवर त्यांचा जादा विश्वास होता. चार लोक एकत्र झाले की भगवंताच्या भजन-पूजनाचा ते उपदेश करत होते. लहानपणापासून सत्संगाची आवड होती.

श्री रामानंद यांच्याकडून कबीरांनी राम मंत्र शिकून घेतला. गुरुंच्या मुखातून सहज प्रकट झालेला राम शब्द त्यांनी आपल्या अंत:करणात स्थिर केला. रामनामाचे सदैव चिंतन केल्यामुळे त्यांचे अंत:करण शुद्ध झाले.

कबीरांचे मन घरातील कामधंद्यात रममाण होत नव्हते. ते गुरुंच्याकडे सतत जात होते. श्री रामानंद यांनी कबीरांची निष्ठा पाहिली आणि त्यांना आपले शिष्य बनविले. कबीरांच्या हृदयपटलावर ती सुसंस्कार अंकित केले.

कबीरांनी मानवी जीवनाचे अवलोकन केले. माणूस आंतरिक सद्भाव वाढविण्यापेक्षा बाह्य परमार्थात किती रमून गेला आहे याची जाणीव कबीरांना झाली. जोपर्यंत अंत:करण शुद्ध होत नाही तोपर्यंत परमार्थाची ओळख होत नाही हे सूत्र कबीरांनी स्वत: जाणून घेतले.

**बुरा देखने मैं चला, बुरा न मिलिया कोय ।**
**जो दिल खोला अपना मुझसे बुरा न कोय ॥१॥**

कबीर म्हणतात, की वाईट माणसांचे संशोधन करण्याचा प्रयत्न केला पण मला वाईट माणसे भेटली नाहीत. परंतु ज्यावेळी माझे अंत:करण पाहिले त्यावेळी माझ्यासारखा कोणीच वाईट नव्हता. स्वत:च्या अंत:करणाला जाणण्याची शिकवण कबीरांनी साऱ्या समाजाला दिली.

हिंदू, मुसलमान व अन्य लोक कबीरांकडे येत होते परंपु कबीरांच्या मनात कोणत्याही प्रकारचा भेदभाव नव्हता. परमेश्वराची सत्ता एकच आहे अणि आपण सर्वजण ईश्वराची लेकरे आहोत अशी त्यांची विचारसरणी होती. माणूस हा केंद्रबिंदू ठेऊन ते समाजप्रबोधनाचे कार्य करत होते.

कबीर सत्याचे पुजारी होते. देवाच्या नावावर चाललेले ढोंग त्यांना आवडत नसे. कोणालाही न भिता ते आपले विचार समाजासमोर मांडत होते. विश्वाला चालविणारी जी शक्ती आहे तिचे भजन करावे. आपले प्रत्येक सत्याच्या मार्गावर पाऊल टाकावे, कोणाला दुखवू नये असा साधा सोपा उपदेश ते सर्वांना करत होते.

कबीरांच्या साहित्यातून सत्य सहजतेने प्रकट झाले आहे. आपल्यातील देवत्व प्रकट कसे करावे याची शिकवण कबीरांनी दिली. देव जसा शब्दरूप आहे तसे आपणही सत्यरूप झाल्याशिवाय त्याचे व आपले मिलन होऊ शकणार नाही. आपण सत्य मानणे हीच आपली पूजा होय. आपले आचार, विचार उच्चार सत्य ठेवणे हीच आपली साधना होय.

कबीरांनी सर्वत्र भरलेल्या चैतन्याचे दर्शन घेतले होते त्यामुळे त्यांच्या मनातील सर्व प्रकारचे द्वैत संपलेले होते. जीव, जगत व जगतात्मा एकच आहेत यांची त्यांना जाणीव झाली होती. सर्व प्रकारच्या शब्दज्ञानाच्या पलीकडे कबीर पोहचले होते. आपल्या आतील आत्मारामाची त्यांनी अनुभूती घेतली होती. कोणत्याही प्रकारे त्यांना आपले महत्त्व वाढवायचे नव्हते. मानसन्मानाची इच्छा त्यांच्या मनात नव्हती. लोकांनी सत्य जाणावे यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केला.

**तनको जोगी सब करे । मन को बिरला कोय ।**
**राव विधि सहजै पाईये । जै मन जोगी होय ॥**

शरीराला जोगी बनविणे सोपे आहे पण मनाला जोगी बनविणे अवघड आहे. जो मनाला जोगी बनवितो त्याला सर्वकाही प्राप्त होते.

संत कबीरांनी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सर्व समाजाला सत्याचा उपदेश केला. आपले आचरण शुद्ध झाल्याशिवाय ईश्वराची प्राप्ती होणार नाही असे स्पष्टपणे सांगितले. परमार्थातील सर्व मार्ग एका सत्याकडे जातात. मानवाने आपसातील सर्व प्रकारचे संघर्ष मिटवावेत. एकमेकांना सहकार्य करत जीवन जगावे. रामनामाचे स्मरण करीत कर्म करावे. ज्ञानाचे रुपांतर अंकारात न करता प्रेमात करावे. देव सर्व काही जाणतो म्हणून खोटेपणाने वागू नये. देवाला अनन्यभावाने शरण जावे. साध्यासोप्या वाणीतून कबीरांनी समाजाला उपदेश केला.

संवत १५७५ मध्ये गद्दर येथे रामनामाचे चिंतन करत त्यांनी देह ठेवला.

ooo

# राजयोगी श्री माणिकप्रभू

**गजानन कुलकर्णी**
रत्नागिरी.

मोंगलाईत निजाम हैद्राबाद राज्यात (आजच्या म्हैसूर राज्यात) कल्याण गावी मनोहर नाईक नावाचे परम भगवद्भक्त रहात होते. त्यांच्या धर्मपत्नीचे नांव होते बायजाबाई. हे दांपत्य दत्तोपासक असून अहोरात्र दत्तसेवा करण्यात निमग्न असे. दत्ताच्या आशीर्वादाने पुढे त्यांना तीन पुत्र झाले. पहिला मुलगा हणमंत, दुसरा माणिकप्रभू आणि तिसरा नरसिंह.

मनोहर नाईकांना दृष्टांत झाल्याप्रमाणे श्रीदत्तप्रभूंनी माणिकप्रभूंच्या रुपाने या धर्मपरायण दांपत्याच्या पोटी शके १७३९ म्हणजे सन १८१७ मध्ये अवतार घेतला. बारशाच्या दिवशी मुलांचे नाव 'माणिकप्रभू' असे ठेवण्यात आले. बालप्रभूंचे अनुपम तेज पाहून कल्याण गावातील लोक आकृष्ट झाले. गावातील व आसपासच्या खेड्यातील लोक या दत्तावतारी प्रभूंच्या दर्शनास येऊ लागले.

कल्याण गावातील अधिकारी नवाबसाहेबांची मनोहरपंतांच्या कुटुंबावर पूर्ण कृपादृष्टी होती. त्यामुळे माणिकप्रभूंची सर्व व्यवस्था लहानपणापासूनच राजयोग्याप्रमाणे होती. त्यांच्या अंगावर हजारो रुपयाचे हिरे, मोती व सोन्याचे दागिने आणि भरजरी उंची वस्त्रे होती. या वस्तू सांभाळण्यासाठी त्यांचे सभोवती नेहमी पाच-सहा अरब रोहिले शिपाई नबाबाने ठेविले होते. माणिकप्रभूंस पाचवे वर्ष लागल्यानंतर त्यांची वृत्ती फारच खेळकर होत गेली. गावातील मुलांबरोबर ते नानाप्रकारचे खेळ खेळू लागले.

कल्याण गावात माणिकप्रभू या नावाचा दत्तावतार झाला आहे अशी बातमी सर्वत्र पसरल्यामुळे दर गुरुवारी आसपासचे लोक दर्शनास जमू लागले. पुढे सातव्या वर्षी मौजिबंधनाचा कार्यक्रम मोठ्या थाटात झाला. गायत्री मंत्राचा उपदेश होताच सर्व ब्रह्मकर्म आपोआप स्वमुखाने हे म्हणू लागले. हा चमत्कार पाहून जमलेले सर्व शास्त्री, पंडित, वैदिक, याज्ञिक वगैरे थक्कच होऊन गेले. हे कोणी महापुरुष असावेत असे सर्वांनाच वाटू लागले.

प्रभू कधी शाळेत गेले नाहीत; परंतु त्यांना बालपणापासूनच तेलंगी, कानडी, फारसी, उर्दू, संस्कृत आणि मराठी इतक्या भाषा लिहिता-वाचता आणि बोलता येऊ लागल्या. शिकल्याशिवाय त्यांना स्वयंस्फूर्तीने संपूर्ण ब्रह्मकर्म व वेदशास्त्रातील सर्व विषय अगदी मुखोद्गत येत होते. चार वेद आणि सहा शास्त्रात पारंगत असलेल्या पंडितांचीही त्यांच्यासमोर बोलण्याची प्राज्ञा नव्हती.

प्रभूस आठवे वर्ष लागल्यावर त्यांची वृत्ती फारच चपळ व चंचल होत गेली. ते गावातील मुले जमवून गावात व अरण्यात जाऊन खेळू लागले. एकदा घराबाहेर पडले की दोन-दोन दिवस घरात येत नसत. घरची मंडळी त्यांचा पुष्कळ शोध करीत परंतु प्रभू सापडतच नसत. अशा परिस्थितीत प्रभूंच्या अंगावर दागदागीने राहीले नाहीत. त्यांनी कांही दागिने लोकांना वाटून टाकले. मग नबाबाचा अरब रोहील्याचा पहारा जागच्या जागी राहीला. आंधळ्या-पांगळ्या लोकांकडे प्रभू नेहमी दयाळू दृष्टीने पहात असत. अशावेळी धर्माचा अडसर त्यांना कधीच आडवा आला नाही. हिंदु मुसलमान दोन्ही जमातीवर त्यांची सारखीच कृपादृष्टी होती. त्यामुळे बहुसंख्य मुस्लीम समाजही त्यांच्या भजनी लागला. अखेर प्रभूंचा हा लौकीक निजामाच्या कानापर्यंत जाऊन पोहोचला.

प्रभू आता घराबाहेर पडण्याचा विचार करू लागले. प्रभूंचे थोरले बंधू दादासाहेब आता सोळा वर्षांचे झाले होते. ते एकांतात राहून अहोरात्र ईश्वरचिंतनात मग्न असत. धाकटे बंधू तात्यासाहेब चार वर्षांचे झाले होते. अशावेळी प्रभू एके दिवशी कोणासही न विचारता घराबाहेर पडले; व हुमणाबादपासून वीस कोस दूर असलेल्या मंठाळ गावास जाऊन पोचले. बाहेर गावचे हजारो लोक प्रभूंच्या दर्शनास येत परंतु प्रभू तेथे नाहीत असे पाहून ते दादासाहेबांच्या दर्शनावर समाधान मानून नवस वगैरे अर्पण करीत.

प्रभू मंठाळ गावी आहेत असे समजताच प्रभूंचे वडील व मातोश्री तात्यासाहेबांना बरोबर घेऊन मंठाळ गावी जाऊन प्रभूंना भेटले. तेव्हां प्रभू त्यांना म्हणाले, श्रीदत्तात्रयाच्या साक्षात्काराप्रमाणे आम्ही तुमच्या पोटी जन्म घेतला, तुमचे मनोरथ पूर्ण केले. व्रतबंधहोईपर्यंत तुमच्या जवळ राहीलो. आता आम्हांस सर्वत्र संचार करून अवतारीक कृत्ये केली पाहीजेत. भक्तजनांच्या उद्धारासाठी आमचा हा अवतार आहे. म्हणून यापुढे तुम्ही आमच्याविषयी दु:ख व क्लेष करून घेऊ नयेत. घरी जाऊन दत्तसेवा करून कालक्रमणा करावी. तयतून तुमचा आग्रहच आहे म्हणून सांगतो; आम्ही लवकरच तुम्हास येऊन भेटू. आता आपण परत जावे. असे म्हणून प्रभूंनी त्यांना निरोप दिला. प्रभू एक वर्षपर्यंत मंठाळच्या अरण्यात अंबील कुंडाजवळील एका गुहेत गुप्त राहीले. कधीमधी प्रभू मंठाळच्या लोकांना दर्शन देत. ही गुहा अद्याप तेथे असून 'माणिकप्रभूंची

गुहा' या नावाने प्रसिद्ध आहे.

एक वर्षानंतर प्रभू अचानक एकाएकी कल्याणास घरी येऊन दत्त म्हणून दारात उभे राहीले. लोकांना ही बातमी कळताच हजारो लोक दर्शनास येऊ लागले. हजारो रुपये प्रभूंपुढे जमा होऊ लागले. प्रभू ते सर्व रुपये रोजच्या रोज गरीबांना खैरात करू लागले. रोज कथा, कीर्तने, पुराणे, भजने व गाण्याचा कार्यक्रम प्रभूंपुढे होत असे. असा कार्यक्रम चारपाच वर्षांपर्यंत चालू होता.

तात्यासाहेबांची मुंज झाल्यानंतर काही महिन्यातच मनोहरपंतांची समाधी झाली. त्यामुळे प्रभूंच्या मातोश्री बयाबाई यांना अत्यंत दुःख झाले. प्रभूंनी आपल्या ज्ञानसामर्थ्यांनी मातोश्रींचे नानाप्रकारे समाधान करून वडीलबंधू दादासाहेब यांचेकडून वडीलांचे उत्तरकार्य यथासांग करविले आणि हजारो रुपयांचा दानधर्म केला. नंतर प्रभू कल्याणहून निघाले ते सहा कोसांवर असलेल्या पांचाळ गावी पांचाळेश्वर मारुतीच्या देवळात येऊन राहीले. तेथे समाराधना वगैरे करून एक अष्टक करून त्यांनी मारुतीची प्रार्थना केली. नंतर तेथून प्रभू मैलार गावी आपले कुलदैवत श्रीखंडोबाच्या दर्शनासाठी चंपाषष्ठीस होणाऱ्या यात्रेसाठी गेले. तेथे त्यांनी श्रीखंडोबाची महापूजा बांधून हजारो रुपयांचे वस्त्रालंकार देवास अर्पण केले; व गोरगरीबास हजारो रुपयांचा दानधर्म केला. त्यानंतर दत्तजयंतीचा उत्सव तेथे मोठ्या थाटात साजरा केला. हैदराबादचे राजे बंसीधर यांनी दत्तजयंती उत्सवाचा सर्व खर्च केला होता.

मैलारहून प्रभू पुन्हां आपल्या घरी कल्याणास आले. तेथे आल्यावर प्रभूंनी मुलगी पाहून आपले धाकटे बंधू तात्यासाहेब यांचे लग्न ठरविले. कल्याणच्या नबाबसाहेबांनी लग्नासाठी दहा हजार रुपये खर्च करून लग्नसमारंभ मोठ्या थाटाने केला. ब्राह्मण भोजने, दानधर्म तसेच सर्व जमातींना, जातीच्या लोकांना भोजन देऊन लग्नाचा सोहळा पार पडला. यामुळे प्रभूंची किर्ती सर्वत्र पसरून शेकडो कोसांवरून नित्य नवी यात्रा दर्शनास येऊ लागली. पुष्कळ पर्यटन करून व अनेक अतर्क्य चमत्कार दाखवून नंतर मुधोळ गावच्या एका गुहेत प्रभू समाधी लावून बसले. पुढे ते मुधोळ संस्थानात फिरत असता एका वडाऱ्यास सर्पदंश होऊन तो मृत्यू पावला असता प्रभूंनी त्याला पुन्हा जिवंत केले. त्यामुळे त्याची पुष्कळ किर्ती होऊन तेथे यात्रा भरण्यास प्रारंभ झाला. मुधोळच्या आसपास प्रभूंच्या दहापाच गाद्या स्थापन झाल्या.

प्रभूंची किर्ती आता दशदिशात पसरली होती. प्रभू दत्तावतारच आहेत याबाबत लोकांची खात्री पटली होती. रोज नवनवे चमत्कार घडतच होते. याच सुमारास आणखी एक मोठा चमत्कार घडला. हुमणाबाद आणि गडवंती यांच्या दरम्यान निबिड अरण्यात असलेल्या एका जुन्या शिवालयात एका ब्राह्मण कुटुंबाला ते श्रीप्रभूंच्या दर्शनासाठी येत असता हत्यारबंद लुटारू चोरांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांचे सर्व वित्त लुटून त्यांचा प्राण घेण्यासाठी शस्त्रे उगारली. तेव्हा सर्व मंडळींनी प्रभूंचा धावा केला. त्याचवेळी भक्तवत्सल श्रीप्रभू तेथे प्रगट झाले. श्रीसद्गुरु माणिकप्रभूंच्या दिव्य तेजशक्तीमुळे चोरांनी मारण्यासाठी वर केलेले हात जागच्या जागी थिजून गेले आणि पाय लुळे पडले. तेव्हा चोर श्रीप्रभूंना शरण गेले व त्यांची त्यांनी माफी मागितली. त्यांना झालेला पश्चात्ताप पाहून प्रभूंना त्यांची दया आली. त्यांनी चोरांचे थिजलेले हात आणि लुळे पडलेले पाय पूर्ववत् ठीक केले. तेव्हा प्रभूंना वंदन करून ते चोर आनंदाने तेथून निगून गेले. श्रीप्रभूंनी त्या ब्राह्मण कुटुंबाचे कोटकल्याण केले आणि त्या दिवसापासून प्रभूंनी आपले राहण्याचे ठिकाण तेथेच करून पुढे समाधीकाळापर्यंत भक्तजनांचा उद्धार करीत तेथेच राहीले.

प्रभू अरण्यात शिवालयाजवळ येऊन राहिल्याची खबर लागताच हुमणाबादेहून सरकारी अंमलदार नायब श्रीप्रभूंच्या दर्शनास आले व जून्या शिवालयाची साफसफाई करून देवास रुद्राभिषेक करण्यात आला. पाच दिवस तेथे मोठा समारंभ झाला ब्राह्मणभोजने आणि इतर सर्व जमातींना प्रसादाचे भोजन देण्यात आले. ब्राह्मणांना प्रभूंनी दक्षिणा दिली आणि गोरगरीबांसाठी पुष्कळ दानधर्म केला. प्रभूंच्या दर्शनाला तिथे हजारो लोक येऊ लागले. प्रभू एका जुनाटबेलाच्या खोडाखाली उघड्यातच बसत. यात्रेसाठी येणारे लोक कोणी झाडाखाली तर कोणी पाल्याचे पडदे लावून राहू लागले.

हुमणाबादच्या सरकारी नामक व कामदार मंडळींनी साहित्य सरंजामाची कोठी तेथे लावून दिली आणि सेवेसाठी व इतर व्यवस्थेसाठी चाकर माणसे ठेवली. त्याचवेळी कल्याणहून तात्यासाहेब मातोश्री व अन्य भक्तमंडळींसह राहण्यासाठी म्हणून प्रभूंकडे आले. परंतु प्रभूंनी त्यांना दादासाहेबांजवळ राहण्याची व आठवड्यातून एक वेळ गुरुवारी किंवा शनिवारी जमेल तसे तेथे येण्याची आज्ञा केली. इतर ब्राह्मण यात्रेकरू, आंधळे, पांगले आणि सेवेकरीत राहीलेल रोगी यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था मात्र भंडारखान्यातून होत असे.

पुढे दत्तजयंतीचा उत्सव फारच थाटात झाला. याचवेळी तात्यासाहेबांनी प्रभूंची आज्ञा घेऊन विद्वान ब्राह्मणाकडून श्रीदत्ताच्या गादीची स्थापना केली. तात्यासाहेब, देशमुख, नायब वगैरे मंडळींनी प्रभूंच्या आज्ञेने बऱ्याच झोपड्या बांधून त्या जागेस गावाची रचना आणली. श्रीदत्ताची गादी व प्रभूंसाठी वर छपरी घालून व खाली पक्की चिरेबंदी इमारत बांधून जागा सुशोभित केली. पुढे चारपाच वर्षांनी सर्व जागा व्यवस्थित करून या पुण्यस्थळास **'श्रीमाणिकनगर'** असे नाव ठेवले. भक्तजनांनी पुढे माणिकप्रभूंकरीता गादी तयार केलीआणि भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी प्रभू त्यावर आनंदाने बसू लागले नीदत्ताच्या गादीजवळ नित्य भजन, पूजन व आरत्यांचा थाट होऊं लागला.

अरब व रोहीले लोकांत प्रभूंची किर्ती होऊन ते प्रभूंच्या दर्शनास येऊ लागले. पुढेपुढे तर मुसलमान लोकांचे मेळे व

मोठमोठे पीरजादे प्रभूंच्या दर्शनास येऊ लागले. प्रभू हिंदू व मुसलमान भक्तांच्य सर्व मागण्या पुऱ्या करीत. कोणाची पोटदुखी बरी करणे, कोणास मुल देणे, महारोग बरे करणे, पिशाच्च काढणे, इत्यादी हजारो मागण्या प्रभूंच्या जवळ येत. यात्रेकरू, व्यापारी, शेठ सावकार, सरकारी कामगार, इत्यादी लोकांचे प्रभूंपुढे लाखो रुपये भेट म्हणून जमत असत. हिंदू व मुसलमान यांचे मिळून वर्षातून चार यात्रा प्रभूंजवळ जमत असत. मोहरम व ग्यारवी या दोन महिन्यात मुसलमानांचे संक्रांतीस जंगमाचा व दत्तजयंतीस हिंदूंचा मेळा जमत असे. प्रभू सर्वांना एक रुपयापासून हजार रुपयांपर्यंत बिदागी देत असत. जो जे मागेल ते त्याला बहुधा प्रभूंकडून मिळायचेच ! प्रभू नाही कोणाला म्हणत नसत आणि रिक्त हाताने कोणाला जाऊ देत नसत. दरवर्षी एकंदर तीस लाख रुपये खर्च होत असे. याप्रमाणे माणिकनगरात श्रीमाणिकप्रभूंची दिनचर्या नित्य आनंदात व उत्सवात चालत असे. वरील वर्णनावरून वाचकांना प्रभूंच्या ऐश्वर्याची कल्पना यावी. हे सर्व खर्चाचे आकडे (सन १८१७ ते १८६५) या कालावधीतील आहेत हे विचारात घेऊन अंदाज केल्यास एखादया सार्वभौम राजाला लाजविल असे प्रभूंचे ऐश्वर्य होते हे लक्षात येते.

प्रभूंच्या मानत मात्र कोणताही राजकीय थाट वाढविण्याचा मुळीच हेतू नव्हता. फक्त परोपकार आणि दानधर्म याशिवाय त्यांचा कोणताही हेतून व्हता. परंतु तात्यासाहेबांनीआपल्या हौशीने चारपाच वर्षात माणिकनगरास व प्रभूंच्या दरबारास फारच शोभा आणली. सर्वप्रकारच्या जिनसा मिळण्यासाठी लहानशी बाजारपेठही बसविली गेली.माणिकनगरास पूर्व व पश्चिम अशा दोन मोठ्या वेशी बांधल्या, आणि प्रत्येक वेशीवर नामदार व रोहीले, अरब शिपायांचा बंदोबस्त ठेविले. तसेच नगारखान्याची संस्थापना करण्यात आली.

आधुनिक काळातील श्रीदत्तात्रयांचा चवथा अवतार म्हणून ज्यांचे आदराने नाव घेतले जाते. त्या श्रीमाणिकप्रभूंचा दत्तसंप्रदाय ऐश्वर्यशाली व राजयोगी म्हणूनच प्रसिद्ध आहे. सोने, मोती, हिरे, भरजरी वस्त्रे, संगीतादि कला याचे मोठे विलोभनीय दर्शन या संप्रदायात होते. श्री चैतन्यदेव हे या संप्रदायाचे उपास्यदैवत. दत्तात्रेयांचे स्वरूप येथे मधुमती नावाच्या शक्तिसहीत कल्पिले आहे. हिंदू व मुसलमान, गरीब व श्रीमंत सारख्याच योग्यतेने या पंथात वावरतात. श्रीमाणिकप्रभू, श्रीमनोहरप्रभू व श्रीमार्तण्ड माणिकप्रभू या पुरुषांनी दत्त व श्रीकृष्ण यांच्यावरील संगीतास अनुकुल अशा रागदारीतील अनेक पदे लोकप्रिय केली आहेत. सकलमताचार्य चतुर्थ दत्तावतार श्रीमाणिकप्रभू यांच्या संप्रदायास '**सकलमती**' नाव असल्याचे कारण असे की, यात सर्व संप्रदायाची एकनिष्ठता केली आहे. इतर कोणत्याही संप्रदायास या संप्रदायाचा विरोध नाही. जगातील सर्व धर्म व संप्रदाय त्यांच्या त्यांच्या अनुयायांना परमेश्वरप्राप्ती करून देणाऱ्या आहेत असे हा सकलमत संप्रदाय मानतो.

वर सांगितल्याप्रमाणे चैत्यदेव (आत्मदेव) ही या संप्रदायाची उपास्य देवता असून तिला सर्वात्मा,परब्रह्म असे म्हणतात. तिलाच अधिदैविक स्वरूपात जगद्‌गुरु श्रीदत्तात्रेयांचा चतुर्थ अवतार श्रीमाणिकप्रभू अशी संज्ञा प्राप्त झालेली आहे.याच देवतेला आधिभौतिक स्वरूपात गुलबर्ग्याजवळील कल्याण प्रांती रामतीर्थ क्षेत्रानजीक लाऊवंती गावचे वतनदार कुलकर्णी मनोहर महाराज यांचे चिरंजीव या नावाने ओळखले जाते. दत्तात्रेयांचीआदिशक्ती मधुमती ही याच संप्रदायात महत्वाची मानली गेली आहे. धारेश्वरी, जंबुवादिनी, अरुणिका, मीनाक्षी ही याच मधुमतीची नावे आहेत. सांप्रदायिक उपासनेत मधुमतीसमवेत श्रीदत्तात्रेयांचे ध्यान केले जाते. ''भक्तकामकलाद्रूम गुरु सार्वभौम श्रीमद्राराजाधिराज योगी महाराज त्रिभुवनानंद अद्वैत अभेद निरंजन निर्गुण निरालंब परिपूर्ण सदोदित सकलामत्तस्थापित सद्‌गुरु माणिकप्रभू महाराजकी जय'' असा या संप्रदायाचा महामंत्र आहे.

सकलमतसंप्रदायाचे सिद्धान्तरहस्य समजण्यासाठी काही सूत्रे ध्यानात ठेवण्यासारखी आहेत. (१) आत्मस्वरूप लक्षणे - सत्, चित्, आनंद व प्रकाश तशीच तटस्थ लक्षणे व्यापक, ईश्वरप्रेरक ही नीटपणे समजून घ्यावीत. (२) मतमतांतराविषयी द्वेष न मानता प्रेम वाढवावे. (३) नित्य वाराधिपतीचे भजन, पंचनदी, आरती, शेजारती, उपदेशरत्नमाला यांचा पाठ करावा. (४) सवडीप्रमाणे रोज नियमाने श्रीप्रभूंच्या गादीपुढे वा तसबिरीपुढे नामघोष करावा व प्रेमाने नाचावे. (५) गुरुवारी आणि शनिवारी संध्याकाळी आरत्या व अष्टके म्हणून फुले वाहावी व श्रीप्रसाद सर्वांना वाटावा. (६) पूजेचे अनंत प्रकार असले तरी मानसपूजा, यथाभिलाषित ध्यानधारणा यांना प्रामुख्य असावे. (७) आत्मविद्याभ्यास अगत्याने संपादन करावा. (८) दिवसभरात एकदातरी अर्धा तास एकान्तात मानसिक आत्मचिंतन करावे. (९) आत्मा आकाशाप्रमाणे अस्पर्शआहे. पांचभौतिक विकार तत्संघाकृत विषय, इंद्रियव्यापार, मानसशक्ती याचा कोणाच्याही आत्म्यावर आघात होत नाही हे निश्चयाने ठसवावे. (१०) कैलास, वैकुंठ, स्वर्ग, ब्रह्मलोकादी सर्व पांचभौतिक, आत्मप्रकाश बिंबित मानसशक्तीने मीच बनविले आहेत, माझा आत्मा ह्या लोकांहूनही अनंतपट विभू, स्वयंप्रकाशभूत आहे हे ओळखावे. या संप्रदायाच्या 'ज्ञानमार्तण्ड' नावाच्या ग्रंथात पृष्ठ क्र. २५५ ते २६२ पर्यंत या सिद्धान्त रहस्याचे विवेचन आहे.

माणिकनगर अथवा हुमणाबाद येथील श्रीमाणिकप्रभूंच्या या दत्तसंप्रदायाचे वा परंपरेचे एक वैशिष्ठ्य म्हणजे या पंथात सर्व धर्माच्या, सर्व जातीच्या, सर्व पंथाच्या लोकांना प्रवेश आहे. कित्येक मुसलमानही या गादीपुढे लवून वागणारे आहेत. दुसरे वैशिष्ठ्य म्हणजे, ऐहिक वैभव व ऐश्वर्य यांचे भव्य दर्शन या परंपरेत होते. राजकीय दरबाराप्रमाणे माणिकप्रभूंच्या लोकदरबाराचा थाट असे. प्रभूंच्या डोकीस कधी भरजरी मंदील,

अंगात उंची प्रतीचा अंगरखा, गळ्यात मोत्यांचे हार, कानात कर्णभूषणे, शिरपेच, पागोट्यात तुरा खोवलेला, डोळ्यात सुरमा व तोंडात हुकूमाची नदी, असा थाट असे. तर कधी अंगात कफनीही दिसे. शास्त्री लोकांच्या तत्व चर्चेप्रमाणेच गायन, वादन, नृत्य यांचेही कार्यक्रम या दरबारात होत असत. प्रभूंच्या द्वारात हत्ती, घोडे, पालख्या, मेणे व राजे-राजवाडे झुलत असत. प्रभूंना संस्कृत, कन्नड, तेलगु, उर्दू, फारसी, मराठी इत्यादी भाषा येत असल्याने तितके भाषीक त्यांच्याकडे आकर्षित होत असत. द्रव्याची वा धनसंपत्तीची कधी कमतरताच नव्हती. 'कोठून द्रव्य येते । माहित न होय कोणातें । गादीवर बसता त्वरीते । मुष्टी भरभरुनी देताती ॥' असाच थाट नेहमी असे. प्रभूंच्या परिवारात दाजी भोसले, कंदी किशनराव, जयप्पा सोनार, आबाराव नायब, मेडोज टेलर, तुकाराम धनगर, टर्रा हुसेनखां, नाना नाच्या, असे विविध प्रकारचे लोक असत. राजेरजवाडे, अमीरउमराव, शेटसावकार, साधुसंत, वैरागी, गोसावी, ब्रह्मचारी, संन्यासी, शास्त्री, वैदीक पुराणीक, हरिदास गवई, आण्णाबुवा महाराज, कोल्हापूरचे श्रीकृष्णसरस्वती, व यशवंतरावदेव मामलेदार यांचा व प्रभूंचा निकटचा संबंध होता. अक्कलकोटनिवासी श्रीस्वामीसमर्थ व श्रीमाणिकप्रभू यांची एकान्तात भेट हाते असे. प्रभूंच्या संस्थानात दत्तजयंतीचा सोहळा अप्रतिम असे. जंगमांचा मेळा, मोहरम, महबूब सुभानाची ग्यारवी, असे आणखी कांही उत्सव दत्तपंथीय अशा या सकलमत संप्रदायात होत असत. बापाचार्य, नारायण दीक्षित, चिमण्या ब्रह्मचारी, गोपाळबुवा, रामभाऊ लंगोटी, दयाळपंत दुबळगुंडी, शरण साधु, रामकृष्णपंत तहसीलदार, विठ्ठलपंत तेरपल्ली, रावजीबुवा, चिंतामणबुवा, संतरामदादा गवंडी, अशा अनेक प्रकारचा शिष्यवृंद श्रीमाणिकप्रभू भोवती जमा झाला होता. प्रभूंचा संप्रदायिक संसार आता बराच मोठा झाला होता.

याचवेळी वडीलबंधू दादासाहेब व मातोश्री बयाबाई यांच्या निर्वाणाची वेळ समीप येऊन ठेपल्याचे प्रभूंच्या लक्षात आले. प्रभूंनी दोघांनाही जवळ बोलावून घेऊन ब्रह्मज्ञानाचा उचित बोध केला. पुढे थोड्याच कालावधीत दादासाहेबांनी समाधी घेतली आणि मातोश्री श्रीदत्तस्मरण करीत ब्रह्मरूपी लीन झाल्या. पुढे सर्व विधी धर्मशास्त्राप्रमाणे श्रीप्रभूंच्या व तात्यासाहेबांच्याहाताने झाले. प्रभूंनी हजारो रुपये दोघांप्रित्यर्थ दानधर्म केला.

पुढे काही काळ गेल्यावर शृंगेरी मठाचे जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीमाणिकप्रभूंच्या भेटीस आले. प्रभूंची स्वारी मोठ्या थाटाने श्रीजगद्गुरुंना सामोरी गेली. जगद्गुरुंचे आगमन होताच त्यांनी त्यांना सिंहासनावर बसवून त्यांची तात्यासाहेबांकडून यथासांग पाद्यपूजा केली. जगद्गुरुंना वस्त्र, भूषणे, हत्ती, घोडे, पालख्या सर्व अर्पण केले. भोजन समारंभ मोठ्या थाटाने झाला. प्रभूंचा आदरसत्कार पाहून जगद्गुरुंची स्वारी फारच खूष झाली. पुढे जगद्गुरुंची स्वारी जाण्यासाठी निघील तेव्हा प्रभूंची स्वारी त्यांना दोन कोसपर्यंत पोचविण्यासाठी त्यांचेबरोबर गेली.

ह्या समारंभानंतर काही दिवसातच तात्यासाहेबांची प्रकृती बिघडली. आता तात्यांचाही समाधीकाळ जवळ आलाय हे प्रभूंनी जाणले आणि तात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव मनोहर (अप्पासाहेब) यांच्या मुंजीचा बेत ठरवून मुंज मोठ्या थाटामाटात उरकून घेतली. पुढे तात्यासाहेबांनी स्वत: गुरुचरित्राचे पारायण करून पुष्कळ दानधर्म केला. भजन-पूजनादी सर्व सत्कर्मे साधून नियमित दिवशी आनंदाने बोलणे चालणे करून सर्वांचा निरोपही घेऊन प्रभूंच्या चरणावर मस्तक ठेविले आणि मग योगासन घालून समाधी घेतली. प्रभूंनी त्यांचे चिरंजीव अप्पासाहेबांकडून सर्व उत्तरविधी शास्त्रोक्त करविला आणि हजारो रुपये दानधर्म करून तात्यासाहेबांचे नाव प्रभूंनी अजरामर करून ठेविले.

या प्रसंगानंतर अक्कलकोटचे स्वामीसमर्थ प्रभूंना भेटण्यासाठी आले होते. प्रभूंची व स्वामीची एकांतात भेट झाली आणि यानंतर प्रभूंनी समाधी देण्याचा निश्चय केला. समाधीचा दिवस मार्गशीर्ष शुद्ध एकादशी निश्चित झाला. समाधी घेतल्यानंतर पुढे तीनचार दिवसांपर्यंत ही गोष्ट गुप्त ठेवण्याविषयी प्रभूंनी आपल्या तीनचार विश्वासू भक्तांना बजावून ठेवले होते. प्रभू त्यांना म्हणाले 'तसे न झाले तर मायामोहामुळे मध्येच हा बेत उघड झाल्यास अनर्थ होईल. समाधी घेतल्यानंतर चार दिवसांनी लोकांना दर्शनास सोडावे. समाधी झाल्यावर सोळावे दिवशी अप्पासाहेबांस गादीवर बसवून सर्व व्यवस्था पूर्ववत् चालू ठेवावी.' असे सांगून समाधी तयार करण्याची सर्व व्यवस्था त्यांच्याकडून गुप्तरीतीने करविली.

मार्गशीर्ष शुद्ध एकादशीस सूर्यादयापूर्वी स्नान करून मग अप्पासाहेबांकडून प्रभूंनी पूजाअर्चा करवून गळ्यात पुष्पांचे हार घातले. पंचारती करून घेतली. सर्वांना प्रसाद दिले. नंतर आपल्या गळ्यातील हार काढून अप्पासाहेबांच्या गळ्यात प्रसाद म्हणून घातला आणि सर्वांस आशीर्वाद देऊन प्रभू आत समाधित बसले. मग 'अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त' अशी सर्वांना गर्जना करून एका हाताने नेत्राचे अश्रू पुशीत दुसऱ्या हाताने द्वारास चिरा लावून बंदोबस्त केला. नंतर सर्व मंडळी खिन्न होऊन आपापल्या घरी गेली. शके १७८७ मार्गशीर्ष शुद्ध एकादशी सन १८६५ मध्ये श्रीसद्गुरु माणिकप्रभू समाधिस्त झाले. पुढे सोळाव्या दिवशी अप्पासाहेब महाराज प्रभूंच्या गादीवर विराजमान झाले.

प्रभू मोठे वक्ते आणि अनेक भाषाभिज्ञ होते.त यांनी विपुल काव्यरचना केली आहे. त्यांच्या कविता मोगलाईत व इतर ठिकाणी प्रसिद्ध आहेत. प्रभूंनी 'कल्पतरु' नावाचा ग्रंथही लिहिला आहे. आजही श्रीमाणिकप्रभूंची पुण्यतिथी दरवर्षी थाटात साजरी केली जाते.


# श्रद्धा आणि सबुरीचे फळ

**म. पां. वाळिंबे**, सातारा.

❖❖❖

**सिद्धपुरुषाचा आशीर्वाद लाभणे फार भाग्याची गोष्ट असते. श्री साईबाबांच्या आशीर्वादाने घडलेल्या सहज घटनाही आपणास चमत्कार वाटतात. बऱ्याच अश्रद्धजनांचा त्यावर प्रथम विश्वास बसत नाही पण स्वतःला प्रचिती आली की विश्वास ठेवावाच लागतो. अशाच एका भक्ताने सिद्धयोगी परमाचार्य शंकराचार्यांचा सांगितलेला एक अनुभव.**

❖❖❖



दिनांक २९/१०/९३ रोजी राष्ट्रीयीकृत बँकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन (पेन्शन) द्यावे हा महत्वाचा निर्णय झाला. या योजनेचा लाभ मला मिळणार होता व त्यामुळे आपणांस आर्थिकदृष्ट्या कोणावर अवलंबून रहावे लागणार नाही हा आनंद मोठा होता.

ज्या ज्या वेळी एखादी बिकट समस्या उत्पन्न होई, किंवा आनंदाचा प्रसंग घडे त्या त्या वेळी कांचीपूरम येथील शंकराचार्य मठात श्री गुरुमहाराजांचे दर्शनासाठी मी नेहमीच धांव घेत असे. यावेळीही नोव्हेंबर '९३ च्या पहिल्या आठवड्यातील बुधवारी संध्याकाळी मी कांचीपूरमला गेलो. स्नान करून ताबडतोब श्रीशंकराचार्य मठात महाराजांचे दर्शनासाठी गेलो. धाकट्या महाराजांचे (श्री शंकरविजयेंद्र सरस्वती स्वामीजी अर्थात बालस्वामीजी) दर्शन झाले.

श्रीगुरु शंकराचार्य श्री चंद्रशेखरेंद्र सरस्वती महाराज (परमाचार्य) यांचे १९९३-९४ हे जन्मशताब्दि वर्ष म्हणून सर्वत्र साजरे करण्यात आले. मठात केवळ भारतातीलच नव्हे तर परदेशातील असंख्य भाविकांची गर्दी लोटत होती. त्यावेळी महाराजांची तब्येत बरी नव्हती त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी महाराजांचे दर्शन होणार होते. तथापि माझी भावना आणि प्रांजल मनोगत पूर्व परिचयामुळे मी बालस्वामीजींच्या पुढे खालील शब्दांत व्यक्त केले :

''परमाचार्यांचे कृपाशीर्वादाने सर्व अडचणीतून आणि संकटातून आम्ही पार पडलो आहोत. आता राष्ट्रीयकृत बँकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनही मिळणार असल्याने उर्वरीत आयुष्यातील निर्वाहाचाही आमच्या प्रश्न सुटला आहे. आता मला फक्त काळजी वाटते ती माझ्या ज्येष्ठ कन्येची. विवाहानंतर १४ वर्षे झाली परंतु तिला अपत्यलाभ झालेला नाही. त्याची खंत वाटते. अशातच तिला कर्णपिशाच्यासारखी बाधा झाली. घरकाम आवरल्यावर दुपारी विश्रांतीसाठी पडावे तर कानांत कोणी स्त्री बडबड करीत आहे. असा तिला भास होतो. म्हणूनच तिची आणखी काळजी वाटते.''

दुसरे दिवशी म्हणजे गुरूवारी सकाळी श्री.मठात श्रीगुरू महाराजांचे (परमाचार्यांचे) दर्शनासाठी गेलो. महाराजांचे शिष्य बालसुब्रमण्यम यांनी सांगितले, महाराजांची तब्येत फारच नाजूक झाल्यामुळे यावेळी कोणासही नेहमीप्रमाणे रांगेतून दर्शन देणार नाही. सर्वांना एकदम्च दर्शनाची सोय केली आहे.

अखेर त्या दर्शनाने सुद्धा आम्हांस समाधान वाटले. महाराजांनी सर्वांना हात उंचावून आशिर्वाद दिला. त्यानंतर श्री बालस्वामीजींचे दर्शनासाठी गेलो. स्वामीजींचे दर्शन झाले. नमस्कार केला. तेवढ्यात महाराज म्हणाले, ''आपके कन्याका

स्वास्थ्य ठीक नही है।'' इतके बोलून महाराज आंतील दालनांत जाण्यासाठी निघाले. मी महाराजांना विचारले, ''मग मी काय करू ?'' परमाचार्यांचे श्रीपादुकांकडे निर्देश करून बालस्वामीजी म्हणाले, ''प्रार्थना करो'' श्रीपादुकांजवळ बसून मी मनांत प्रार्थना करू लागलो. परंतु मनाची एकाग्रता होईना ! कन्येची काळजी वाटू लागली. जिवावर बेतलेल्या दोन संकटातून ती आधीच वांचली होती. एवढ्यात बालस्वामीजी दालनांतून बाहेर आले. मला राहवले नाही. ''काळजी करण्यासारखी कन्येची परिस्थिती आहे काय ?'' मी बालस्वामीजींना विचारले. ''तसे असेल तर मी सातान्यास त्वरित परत जातो. महाराजांचे दर्शन झाले माझे येथील काम झाले !'' यावर बालस्वामीजी म्हणाले, ''आप कल सुबह आना, हम आपको बडे महाराजके पास ले जायेंगे और बंदोबस्त करेंगे'' (कांचीपूरमहून मी सातान्यास परत आल्यावर मी कन्येस विचारले, ''त्या दिवशी गुरूवारी तुला काही त्रास होत होता काय ? ''तिने उत्तर दिले,'' होय माझे डोके अतिशय दुखत होते. कोणीतरी घण मारावे तसे. आणि त्रास तर सहन करण्यापलीकडचा होता. त्यादिवशीच मला स्वप्न पडले. कोणी श्वेतवस्त्रधारी योगी स्वप्नात आले व त्यांनी विचारले, ''तुला कांही बाहेरची बाधा झाली काय ?'' मला खूपच रडू येऊ लागले व बोलताही येईना ! पाठीवर हात ठेवून त्यांनी मला आश्वासन दिले, ''बाळ घाबरू नकोस आपण त्याचा बंदोबस्त करू !'')

बालस्वामीजींचे आज्ञेप्रमाणे दुसरे दिवशी सकाळी मी कांची मठात गेलो थोरले महाराज (परमाचार्य) ज्या दालनांत बसले होते, त्या दालनाचे बाहेर प्रतिक्षा करू लागलो. एवढ्यात बालस्वामीजी बाहेर आले. त्यांनी विचारले, ''बडे महाराजका दर्शन हुआ ?' मी नकारार्थी मान हलवली.'' प्रतिक्षा करता हूँ। 'मी म्हणालो, इतक्यातच परमाचार्यांचे कडून आतील दालनातून निरोप घेऊन शिष्य धांवत आला. ''जलदी चलो, महाराज बुलाते है !' मी पटकन् उठलो व शिष्याचे मागोमाग थोरले महाराजांचे दालनांत गेलो. इतर दोन शिष्यासह महाराज बसले होते. 'श्रीगुरू महाराजांना मी साष्टांग नमस्कार केला. कन्येच्या स्वास्थ्यासाठी व संतानप्राप्तीसाठी मी प्रार्थना केली. चंद्रा नांवाचे शिष्यास बोलावून महाराजांनी पूर्ण श्रीफल मागवले व आपल्या हातात घेऊन माझे हातात ठेवले. महाराजांचे एका भक्ताने सांगितलेले मला आठवले, तो म्हणाला होता, की महाराजांची तब्येत गुरू पोर्णिमेस (जुलै महिन्यात) इतकी नाजूक झाली होती की हात वर करण्याचीही त्यांना शक्ती नव्हती. परंतु आज आपल्या हातांनी महाराजांनी पूर्ण श्रीफल (ज्याचे वजन मलाही पेलवत नव्हते) कन्येच्या कल्याणासाठी व संतानप्राप्तीसाठी प्रसाद म्हणून ठेऊन आशिर्वाद दिला. केवढे भाग्य ? माझ्या सारख्या अगदी सामान्य भक्ताची काळजी दूर करण्यासाठी केवढी तळमळ श्रीगुरुमहाराजांचे ठिकाणी होती ! अद्यापही तो प्रसंग आठवला की सर्वांग पुलकीत होते, व न कळत डोळ्यातून अश्रू वाहू लागतात.

मला जर कोणी विचारले की, ''आपण परमेश्वर कधी पाहिला आहे काय ?' तर मी लगेच उत्तर देईन'' होय, श्रीगुरू महाराजांचे स्वरूपात साक्षात परमेश्वराचे मला अगदी जवळून दर्शन झाले आहे. मी धन्य झालो आहे !

श्रीगुरू महाराजांनी दिलेला प्रसाद मी कांचीपूरमहून काळजीपूर्वक सातान्यास आणला व कन्येच्या स्वाधीन केला. कन्येलाही महाराजांचे दर्शनाचा १९८५ साली एकदा योग आला होता. व त्यावेळी महाराजांनी तिला आशीर्वादपण दिला होता. तिचीही महाराजांचे ठिकाणी नितांत श्रद्धा आहे. श्रीफल पूजेत ठेवून ती नित्य श्रद्धापूर्वक पूजा करू लागली.

दि. ८ जानेवारी, मार्गशीर्ष व ॥ एकादशी दिवशी दुपारी श्रीगुरूमहाराज (परमाचार्य) समाधिस्थ झाले. शताब्दि सोहळ्याचे कार्यक्रम सगळीकडे उस्फूर्तपणे संपन्न होत होते. बालस्वामीजी व जयेंद्रसरस्वती स्वामीजी मद्रास जवळ तांबरम् येथे सोहळ्यामध्ये उपस्थित रहाण्यासाठी गेले होते. सातान्यातील श्री.उत्तर चिदंबरम् नटराज मंदिराचे व्यवस्थापकांना सायंकाळी परमाचार्यांच्या निधनाची ही धक्कादायक बातमी कांचीमठातून फोन वरून कळविण्यात आली. माझें मन तर सैरावैरा धावू लागले. काय करावे हे सुचेना ! क्षणांतच डोळ्यापुढून महाराजांचे संदर्भातील आठवणींचा चित्रपटच जणू सरकू लागला ! महाराजांचे ९५ व्या वाढदिवशी सातान्याहून भक्तीभावाने कांची मठात अर्पण केलेले पेढे, त्यातील भक्ती भाव ओळखून प्रेमाने खाल्लेले दोन तीन पेढे, सेवानिवृत्त झाल्यानंतर आम्ही उभयतांनी कांची मठात जाऊन घेतलेले महाराजांचे दर्शन, भक्तीभावाने त्यांना अर्पण केलेली शाल., आणि महाराजांनी ती शाल स्वहस्ते आपल्या अंगावर पांघरून आम्हाला दिलेला आनंद असे कित्येक आठवणीचे आनंददायी प्रसंग ! आणि समाधिस्थ होण्यापूर्वी दोनच महिने आधी आमचे ज्येष्ठ कन्येसाठी दिलेला कृपाप्रसाद ! महाराज तर त्रिकालज्ञानी होते, आपले भक्तांस दर्शनाचा योग पुन्हा येणार नाही हे त्यावेळी जाणत असावेत, म्हणूनच की काय त्यांनी त्याच वेळी पूर्ण श्रीफल देऊन एका सामान्य भक्ताची चिंता दूर केली असे आता वाटू लागते, कारण महाराज म्हणत असत.

What am I here for? To hear sorrows of the people, and to console them, to alliviate them, be it, day or night.

हा झाला श्रद्धेचा भाग।

आता सबुरी विषयी लिहावयाचे म्हणजे -

आपल्याला आपल्या मनोकामना लगेचच पूर्ण व्हाव्यात असेच वाटत असते. ही सर्वसाधारण मानवी प्रवृत्ती असते. महाराज समाधिस्थ झाल्यानंतर पुढे ज्या ज्या वेळी मी कांची मठात प. पू. शंकराचार्यांचे दर्शनासाठी जाई (सांप्रतचे पीठाधिपती) त्या त्या प्रत्येक वेळी मला वाटे, ''महाराज आपली मनोकामना केव्हा पूर्ण करतील ?'' मन अधीर होई. सिद्धपुरूषाचा आशीर्वाद खरा ठरणार ही खात्री होती. परंतु थोडी

सबुरीची आवश्यकता होती. आणि थोर संत महात्म्यांनी, सत्पुरूषांनी व श्री साईबाबांनी सुद्धा भक्तांना सबुरीचा सल्ला दिला आहे.

अखेर तो सुदिन उगवला ! दिवाळीच्या सुमारंभ तब्येतीच्या काही किरकोळ तक्रारीसाठी कन्या डॉक्टरांचे कडे गेली असता गर्भवती असल्याचे निश्चित निदान झाले. त्यामुळे पती-पत्नीस व आम्हांस अतिशय आनंद झाला. अनिश्चिततेचे वातावरण त्यामुळे संपले होते. सत्पुरूषाचा आशिर्वाद अखेर खराच ठरला ! परंतु मन स्वस्थ बसेना ! विवाहोत्तर इतक्या वर्षांनी दिवस राहिलेले ! सर्व कांही व्यवस्थित व्हावे, बालस्वामीजींचे कानांवर ही शुभ वार्ता घालावी आणि त्यांचे आशीर्वाद कन्येसाठी मागावेत यासाठी मी कांची मठांत धांव घेतली. कांचीपूरमला गेलो असतानां बालस्वामीजी व प.पू.शंकराचार्य श्री. जयेंद्रसरस्वती स्वामीजी तिरूपतीस गेले असल्याचे समजले. शनिवारचा दिवस होता. सकाळी महास्वामीजींचे (परमाचार्याचे) समाधीपुढे नम्रतापूर्वक नतमस्तक होऊन कृतज्ञता व्यक्त केली आणि दुपारी बसने तिरूपतीस बालस्वामींकडे धांव घेतली. तिरूपतीस पोहोचेपर्यंत रात्रीचे १०॥ वाजले. ''महाराज विश्रांती घेत असून आपणांस उद्या दर्शन होईल 'असे शिष्याने सांगितले. मी विनंती केली की, ''महाराजांना एवढा निरोप द्यावा की, की सातारहून एक भाविक (माझे नांव सांगितले) भेटू इच्छितात. ''माझ्या चिकाटीचा परिणाम असावा कदाचित, शिष्याने हा निरोप महाराजांना दिला. महाराज निश्चित बोलावतील अशी मनात खात्री होतीच ! आणि झालेही तसेच. शिष्यांनी बाहेर येऊन महाराज बोलावीत असल्याचे सांगितले. मी आंत गेल्याबरोबर महाराजांना साष्टांग नमस्कार घातला आणि शुभवार्ता सांगितली. कृतज्ञतेने माझे डोळे भरून आले होते. माझ्या कन्ये विषयीच्या काळजीचे निवारण करण्यासाठी पुढाकार घेऊन परमाचार्यांना माझी समस्या सांगितली होती. (केवढे भक्ता विषयी प्रेम आणि गुरूमहाराजांचे ठायी असलेली तळमळ !) शुभवार्ता ऐकल्यावर बालस्वामीजींचे चेहऱ्यावर स्मित हास्य उमटले. ''आपण सकाळी यावे. दर्शनाचे वेळी कन्येसाठी 'रक्षा' - कामाक्षीची प्रतिमा - ताईत देतो,'' असे बालस्वामीजी म्हणाले. दुसरे दिवशी सकाळीच मी दर्शनासाठी गेलो. प.पू. बालस्वामीजी व श्री. जयेंद्रसरस्वती स्वामीजी पहाटेच बालाजी मंदिरात देवतेस अभिषेक करण्यासाठी गेले होते. थोडा वेळ प्रतिक्षा केल्यानंतर महाराज मंदिरातून निघून मुक्कामाचे ठिकाणी परत आले.

मी दर्शन घेतले आणि महाराजांनी (बालस्वामीजीनी) कन्येच्या कल्याणासाठी श्री. कामाक्षी देवीची छोटी प्रतिमा प्रसाद म्हणून दिला. त्याच दिवशी सकाळी तिरूपती टेकडीचे पायथ्याशी पूर्व नियोजीत धार्मिक कार्यक्रम होता व दोन्ही शंकराचार्य स्वामीजी परतीच्या प्रवासाच्या गडबडीत होते. सोमवारी सकाळी प.पू. महास्वामीजींचे समाधिस्थानाजवळ श्री पाद्यपूजा करणार असल्याने मलाही कांचीपूरमला परत जावयाचे होते. मठाच्या गाडीतूनच महाराजांनी तिरूपती पायथ्यापर्यंत प्रवासाची माझी व्यवस्था केली. तत्पूर्वी महाराजांनी विचारले, ''भगवानजीका दर्शन हुआ ?'' असंख्य भक्त तिरूपतीस श्री. बालाजीचे दर्शनासाठी जात असतात. मी उत्तर दिले,'मेरे लिये आपही स्वयं भगवान है । आपका दर्शन हुआ, मेरी मनोकामना पूरी हुअी । ''महाराजांनी स्मित हास्य केले.

कांचीपूरमहून सातान्यास परत आल्यावर श्रीगुरू महाराजांनी दिलेला प्रसाद कन्येच्या स्वाधीन केला.

पुढे दोघेही शंकराचार्य स्वामीजी उत्तर भारताचे विजय यात्रेसाठी कांचीपूरमहून निघाले असतां फेब्रुवारी १९९७ चे पहिल्या आठवड्यात सातारा येथील 'श्री उत्तर चिदंबरम् - श्री नटराज मंदिरात त्यांचे दोन दिवस वास्तव्य होते. महाराजांचे दर्शनासाठी आम्ही गेलो असता ज्येष्ठ कन्येने महाराजांना प्रार्थना केली की सातारा येथील वास्तव्यात त्यांनी तिच्या वास्तूमध्ये यावे आणि पाद्यपूजा स्वीकारावी. तिचाही उत्तम योग असा की,''समय मिला तो जरूर आयेंगे'' असे महाराजांनी सांगितले. दुसरे दिवशी शनिवारी गांवात ५/६ ठिकाणी भाविकांनी 'श्री पाद्यपूजा' आयोजित केल्या होत्या. त्याच दिवशी येथील श्रीमद् आद्य शंकराचार्य मठातून सायंकाळी श्री नटराज मंदिरात जातानां दोघेही श्रीगुरू महाराज कन्येचे घरी आले. कन्येने दोघानीही भक्तिभावाने शाल अर्पण केली. आम्हा सर्वांना अतिशय आनंद झाला. आणि आता मात्र आम्ही निश्चिंत झालो की आता कसलीही अडचण न येता सर्व निर्विघ्न पार पडेल।

यथावकाश ३ मार्च १९९७, सोमवार (दासनवमी) रोजी सकाळी ९-२६ वाजतां कन्या प्रसूत होऊन पुत्ररत्न प्राप्त झाले. (विवाहोत्तर १५ वर्षांनी) सर्वांनाच अतिशय आनंद झाला. एक मोठी काळजी दूर झाली. मुलाचे बारशाचा सोहळा मोठ्या थाटांत संपन्न झाला. आई वडिलांनी त्यांचे आवडीचे नांव 'अनुपम' ठेवले. परंतु आम्ही मात्र त्यांस 'योगीराज' या नांवे संबोधतो. श्रीगुरू महाराजांचा हा कृपाप्रसाद आहे आणि महाराजांचे स्मरण आम्हांस नेहमी व्हावे हीच या मागे आमची मनोभावना आहे. ।

सिद्धपुरूषाचा आशिर्वाद आणि संकल्प परमेश्वर पूर्ण करतो याचे चालते बोलते उदाहरण म्हणजे ''आमचा योगीराज'! परंतु त्यासाठी नितांत श्रद्धा व सबुरीची आवश्यकता होती. आता श्रीगुरूमहाराजां जवळ एवढेच मागणे -

**हेचि दान दे श्रीगुरू देवा।**
**तुझा विसर कधी न व्हावा॥**

# जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती

सौ. शकुंतला शंकर जगतकर
गोरेगाव, मुंबई.

अठराव्या शतकाचा उत्तरार्ध व एकोणीसाव्या शतकाचा पूर्वार्ध ह्या काळात नाशिक-नगर जिल्ह्यात बरेचसे संत सत्पुरुष उदयाला आलेले होते. वारकरी संप्रदायाचा प्रभावही समाजावर होता. श्रीक्षेत्र शिरडीमध्ये श्री साईबाबा; साकोरी येथे उपासनी महाराज, नगर येथे मेहरबाबा अशा निरनिराळ्या जाती, धर्म, उपासनेचे संत महात्मे होऊन गेले. त्यांनी भजन-कीर्तन-प्रवचनातून समाज प्रबोधनाचे, जाती निर्मूलनाचे कार्य केले व समाजात बंधुभाव निर्माण केला.

अहमदनगर जिल्ह्यात खंडाळा ह्या गावी श्री यशवंतबाबा (पवार) हे दलित वर्गातील संत होऊन गेले. खंडाळा हे गाव शिरडीपासून वीस पंचवीस किलोमीटर अंतरावर आणि श्रीरामपूर (बेलापूर) स्टेशनपासून दहा-पंधरा किलोमीटर आत आहे. गाव तसा अगदीच खेडेगाव नाही, नगर जिल्ह्यातील जमिन सुपिक, त्यामुळे पाटाच्या पाण्यावर ऊस, ज्वारी आणि आता सुर्यफुलांचे भरघोस उत्पन्न येते. त्यामुळे गावे समृद्ध आहेत.

श्री यशवंतबाबा शिरडी साईबाबांच्या समकालीनच असावेत. श्री यशवंतबाबांच्या बाबतीत असे सांगण्यात येते की ते सुरूवातीला रेल्वेमध्ये पोर्टर म्हणून काम करीत असत. त्यांच्या बालपणीच त्यांना अध्यात्माची ओढ लागली होती. ते विठ्ठलाचे उपासक होते व तिन्ही त्रिकाळ विठ्ठलाच्या नामस्मरणात रमलेले असत. त्यांच्या आशीर्वादाने भक्तांच्या प्रापंचिक अडचणी दूर होत असत. ते स्वतःच पांडुरंगमय झालेले होते.

एकदा श्री बाबा आजारी पडले. त्यांना ताप आला, रजा घेतलेली नव्हती. रेल्वे रूळाचे सांधे जोडण्याचे काम पोर्टरलाच करावे लागे. लहान स्टेशनमधून सांध्यांच्या कंट्रोल ब्रेक्स्‌जवळच पोर्टरला राहायला जागा मिळे. मोठ्या स्टेशनमधून हे ब्रेक्स् कंट्रोल कॅबिनमध्ये असत. बेलापूर (श्रीरामपूर) त्यावेळी लहान स्टेशन होते. गाड्या (दोन्हीकडच्या) यायला अवकाश असल्याने बाबा थोडे आडवे झाले. परंतु तापामुळे त्यांना गाढ झोप लागली. 'अप' आणि 'डाऊन' दोन्ही गाड्यांची वेळ साधारण एक-दोन मिनिटांच्या फरकाने होती. दोन्ही गाड्या एकाच लाईनवर होत्या. ह्या गाड्यांना सांधे द्यायचे होते. सूचना यंत्र (जॉईंट अलार्म) वाजत होते. दोन्ही गाड्या एकमेकांजवळ येत होत्या व धोक्याच्या शिट्या (लोकोमोटिव अलार्म) जोरजोरांत देत होत्या. पोर्टरचा तेथे पत्ता नव्हता. सिग्नल मिळाल्याशिवाय गाडी थांबवता येत नव्हती.

आणि अचानक आश्चर्य घडले ! सांधे जोडले गेले ! गाड्यांना हिरवा बावटा दाखविला गेला ! अपघात टळला ! रेल्वेतील एक कामगार ही बातमी बाबांच्या सौभाग्यवतीला सांगण्याकरीता धावत घरी गेला. बघतो तो बाबा अंथरूणावर तापाने फणफणलेले ! त्याला आश्चर्य वाटले !

इतक्या तापात जाऊन तुम्ही कसे सांधे दिलेत बाबा ? त्याने विचारले. बाबा उठून लगबगीने म्हणाले, ''अरे गाड्या येण्याची वेळ झाली; मला सांधे द्यायला गेले पाहिजे.'' ''बाबा गाड्या तर मघाशीच गेल्या; तुम्हीच नाही का सांधे जोडले; जरा उशीर केला असता तर सगळाच घोटाळा झाला असता. मोठा अपघात टळला.'' ''गाड्या गेल्या ! अरे, मी तर इथेच झोपलो आहे. माझ्या पांडुरंगानेच हे काम केले.'' ''विठ्ठला, विठ्ठला (भक्त दामाजीलाही विठ्ठलाने अशीच मदत केली होती; नाही कां ?) तूं माझी लाज राखलीस.'' ही बातमी स्टेशनमास्तरच्या ऑफीसपर्यंत गेली.

श्री बाबा विठ्ठलाच्या नामस्मरणात नेहमीच रमलेले असतात; हे रेल्वे ऑफीसमध्ये सगळ्यांना माहीत होते. स्टेशनमास्तरला ही बातमी कळल्यानंतर ते स्वतःच बघायला आले. बाबा खरोखरच आजारी होते. ''यशवंता तुझ्या पांडुरंगाने आपल्या सगळ्यावरचेच संकट निवारण केले आहे. तू आता नोकरी सोड. मी वरच्याअधिकाऱ्यांना कळवून तुला काहीतरी इनाम मिळवून देतो.'' त्याप्रमाणे त्यांनी श्री बाबांना नोकरी सोडायला लावली व खंडाळा (श्रीरामपूर) येथे रस्त्याला लागूनच दिड-दोन एकर जमिन त्यावेळच्या शासनाकडून मिळवून दिली.

श्री यशवंतबाबा त्यांनी तिथेच आपले परमार्थाचे कार्य सुरु केले. त्यांच्या अध्यात्मिक शक्तिचा अनुभव लोकांना येऊ लागला. दूरवर त्यांचा लौकिक पसरला. लोक त्यांचा अनुग्रह मिळण्याकरिता येऊ लागले. श्री. विठ्ठलराव देशपांडे हे त्यावेळी बेलापूर (श्रीरामपूर) शुगर कंपनीचे मॅनेजर होते. त्यांनाही

श्री बाबांच्या आशीर्वादाचा लाभ मिळालेला होता.

आमच्या आईला अस्थमा होता. पन्नास-साठ वर्षांपूर्वी अस्थम्यावर कुठलेही प्रभावी औषध नव्हते. एकदा प्रभाकर देशपांडे घरी आले असता आईला जोरात श्वास (दमा) लागला होता. देवावरच विसंबून सगळे चालले होते. देशपांडेंनी ते बघितले व काकांना सांगितले, ''अरे तू वहिनीला यशवंतबाबांच्या दर्शनाला घेऊन जा. नक्की बरे वाटेल. आम्ही सगळे बाबांच्या दर्शनाला नेहमीच जात असतो.'' काकांनी बाबांना सांगितले व आम्ही सगळे श्री बाबांच्या दर्शनास गेलो. काका, बाबा, आई, दोन बहिणी आणि मी. मी त्यावेळी दोन-अडीच वर्षांची असेन. श्री बाबांनी माझ्या वडिलांना विठ्ठलाचा जप करायला सांगितले. थोड्या वेळाने आईच्या डोक्यावर हात ठेवला. आईला खरोखरच थोडे हलके वाटले. अस्थम्याचा जो प्रखर प्रभाव होता तो कमी झाला. मग बाबांनी सांगितले ''आता हळूहळू अस्थमा कमीहोत जाईल .जप करीत रहा.''

श्रीमती सोनाबाई ह्या सोनामावशी म्हणूनच लक्षात आहेत. त्या मारवाडी जैन समाजाच्या. ईगतपूरीजवळ घोटी ह्या ठिकाणी राहत असत. तिथून त्या बाबांच्या दर्शनाकरिता त्यांच्या अत्यावस्थ यजमानांना घेऊन आल्या. बाबांनी त्यांना देवासमोर बसविले. स्वत: नामस्करण केले आणि एक पेलाभर पाणी त्यांना प्यायला दिले व त्यांच्या डोक्यावर हात ठेवला. त्यांना ताबडतोब बरे वाटले. दोन दिवस राहून त्या गेल्या. येताना बस स्टॅंडवर त्यांनी त्यांच्या यजमानांना एका माणसाच्या पाठीवर घालून आणले होते. जाताना ते पायी चालत बस स्टॅंडपर्यंत गेले. तेव्हापासून सोनामावशी बाबांच्या सेवेत होत्या. त्यानंतर त्यांचे भाऊ राजाराम व सगळे कुटुंबिय बाबांच्या सेवेत आले.

माझ्या वडिलांना संत सत्पुरुषाच्या दर्शनाची, त्यांच्या मार्गदर्शनाची नेहमीच ओढ असे. त्यामुळे जन्माच्या अगोदरपासूनच सत्पुरुषांचे आशीर्वाद मला लाभले आहेत. मी सात-आठ वर्षांची असताना यशवंतबाबांनी समाधी घेतली. सन १९३९ किंवा १९४० साल असावे. बाबांच्या सान्निध्यात राहण्याचे भाग्य मला लाभले. बाबांच्या समवेत आम्ही सगळे (सगळा ग्रुप) पाच वेळा पंढरपुरला गेलो. प्रवासात खाणेपिणे, सगळ्यांबरोबर प्रेमळपणाने वागणे अशा भक्तिभावपूर्ण वातावरणात यात्रा होत असत. काकड आरती, धूप आरती, शेज आरती सगळे दर्शन व्यवस्थित होत असे.

श्री बाबा हयात असताना वर्षातून एकदा भंडारा होत असे. प्रसादाला गावातील भक्तमंडळीही येत असत. बाहेरगावाहून येणारे शिष्यही एकत्र येत असत. दिवसभर कार्यक्रम भजन-किर्तन; दुपारी प्रसादानंतर अध्यात्मिक विषयावर चर्चा, जाती निर्मुलन; उच्चनीचतेवर चर्चा होत असे. त्याचप्रमाणे एकमेकांचे विचार समजून घेणे वगैरे कार्यक्रम होत.

स्वातंत्र्याचा पूर्वकाळ व स्वातंत्र्यानंतरचा काळ बघितला तर भारतात सर्वधर्मसमभाव ह्या नात्याने समाज गुण्यागोविंदाने नांदत होता. समाजातील धर्मान्धिता व जातीभेद नष्ट करण्याकरिता संत-सत्पुरुष महात्मे ह्यांचा फार मोठा वाटा आहे. सामाजिक प्रबोधन, कथा कीर्तन, प्रवचन ह्यातून सामान्य माणसापर्यंत पोहचले जाई. श्रीसंत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज ह्यांनी गावोगावी दौरे काढून प्रवचन कीर्तनातून समाज प्रबोधनाचे कार्य केले. तुकडोजी महाराज ह्यांना राष्ट्रीय संत म्हणून त्यावेळच्या शासनाने गौरविले व सन्मान देऊन भूषविले.

श्री यशवंतबाबांनीही समाज प्रबोधनाचे व जनकल्याणाचे काम केले. दलित समाज हा अजूनही आर्थिक दृष्टीने फार मागासलेला आहे. समाजाचा कल सद्‌भावनेवर असल्याने श्रीबाबांचा चरितार्थ दान दक्षिणेतूनच चालत असे. एकदा बाबांनी त्यांच्या शिष्यांजवळ त्यांच्या राहत्या जागेतच विठ्ठल मंदिर बांधण्याची इच्छा प्रगट केली. त्याप्रमाणे विठ्ठलराव देशपांडे, सोनाबाई, जाधव आणि इतर शिष्य यांनी वर्गणी काढून व इतरांकडून देणग्या जमा करून मंदिराच्या कामास सुरुवात केली. थोडे काम झाले. पुन्हा वर्गणी गोळा केली. देवळाचे काम अर्धे झाले तेवढ्यात बाबा म्हणाले, ''पांडुरंग मला बोलावित आहे. मला गेले पाहिजे. सगळ्यांना भेटीकरीता बोलावून घ्या.'' बाबा गेले आणि मंदिराचे काम अर्धवट राहिले ते आजही तशाच अवस्थेत आहे.

## विनवणी

शुभा शुभ सारे तुझ्याच कृपेने
नमितो भक्तिने साईनाथा ॥१॥

कीर्ति अपकीर्ति सकलांचे मूळ
सदा सर्वकाळ तूचि एक ॥२॥

न जाणे हे मर्म तोचि मूढ खुळा
त्यासग आगळा दुजा नाही ॥३॥

ख्याती तुझी ऐसी कृपा सर्वांवरी
तैसी मजवर असो द्यावी ॥४॥

■ प्र. अ. पुराणिक

# दैवी संपदा

प्रणव



❖❖❖

**मनुष्याला जीवन जगण्यास अर्थ संपदा लागते पण मानवी जीवन सुयोग्यपणे तरूण मोक्षाप्रत जाण्यासाठी लागते ती दैवी संपदा ! भगवद्‌गीतेमध्ये श्रीकृष्णांनी या दैवीसंपदेबद्दल सविस्तर सांगितले असून ही दैवी संपदा म्हणजेच मानवी जीवनमूल्याचे अधिष्ठान होय. ही दैवीसंपदा कोणती ? सांगताहेत साईभक्त प्रणव.**

❖❖❖

सर्व काळातील मानवी संघर्ष हा दैवी व आसुरी संपदा यातील संघर्ष आहे हा गीतेचा सिद्धांत आहे. दैवी संपदा ही सुबुद्धिदायक आहे व आसुरी ही अहंकारजन्य. दैवी संपदा ही मोक्षदायी आहे व आसुरी ही बद्धता. कुठल्या मार्गाने जायचे हे प्रत्येक व्यक्तीने ठरवावयाचे आहे.

**नमो दैव्यै महादेव्यै शिवायै सततं नम: ।**
**नम: प्रकृत्यै भद्रायै नियत: प्रणत: स्म ताम् ।**

देवि अथर्व-८

दुर्गा सप्तशतीमध्ये या महादेवीची गोष्ट सांगितली आहे. कोणे एके काळी महिषासूराने सर्व देवतांचे अधिकार स्वत:कडेच दर्पाने घेतले तेव्हा सर्व देवता दीन झाल्या व महाविष्णुकडे गेल्या. त्यांनी विष्णुमायेची स्तुती केली. विष्णुमायेने महालक्ष्मीच्या स्वरूपात तेजोनिधी रूप घेतले. ती त्रिगुणी आहे. तिनेच पुढे महासरस्वतीचे सात्विक स्वरूप घेऊन शुंभ व निशुंभ या राक्षसांचा पराभव केला व महाकालीचे तामसिक रूप घेऊन मधुकैटभाचा नाश केला. शेवटी महालक्ष्मीने महिषासूराचाहि अंत केला.

दुर्गा सप्तशतीची ही गोष्ट व गीतेतील दैवी व आसुरी संपदेचा संघर्ष या दोहोंचा समन्वय साधून श्रीज्ञानदेवांनी सातशे वर्षांपूर्वी मांडलेले विचार आजही मननीय आहेत.

**की गीता हे सप्तशती ।**
**मंत्रप्रतिपाद्य भगवती ।**
**मोह महिषा मुक्ती ।**
**आनंदली असे ॥**

गीता हीच सप्तशती व मोहरूपी महिषासुरावर विजय मिळवणारा आत्मस्वरूपी श्रीकृष्णाचा मंजुळ स्वर आजहि नाद भरतोच आहे.

अभय, दान, दम, स्वाध्याय, तप, आर्जव, अहिंसा, सत्य, त्याग, दया, शांती, मार्दव, क्षमा व तेज हे दैवी संपदेचे गुण. हे सर्व तेजोनिधी महालक्ष्मीचे मांगल्य. शरीर तेजोमय असते तेव्हा ही दैवी संपदा तेथे स्थिर राहते. तेजोहीन व्यक्ती आसुरी होते.

दंभ, दर्प, क्रोध, अज्ञान व अहंकार हे आसुरी संपदेचे गुण. हे अर्थातच तेजोहीनतेचे व्यक्त रूप.

अहिंसा ही दैवी संपदा आहे. अहिंसा व इंद्रिय निग्रह यांचा अन्योन्य संबंध आहे. इंद्रिय निग्रह साधला नाही तर अहिंसा हे तत्व आचरणात आणताच येणार नाही. इंद्रिय निग्रह नसेल तर पुरुष बलहीन तेजोहीन होतो व त्यामुळेच तो हिंसेकडे वळतो.

गीतेच्या या कालत्रयातील वाहणाऱ्या तत्वज्ञानामुळे आणखीन नवीन ते काय सांगायचे ? बीभत्स व अश्लील दृष्यांचा समाजपुरूषावर अहर्निश वाईट परिणाम होतो आहे. **'भद्रं पश्येमक्षभि:'** ही सनातन प्रार्थना आम्ही जणु विसरूनच गेलो. यावर समाजसेवकांनी तळमळीने लिहीलेले आहे. कायदा अश्लीलतेची व्याख्या शोधत बसला आहे. घटनेतील स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार नव्हे, हे आमच्या ध्यानी येत नाही. गीतेची बाजू मांडणारा वकील आम्ही शोधतो आहोत की काय हे कळत नाही. पण गीतादेवी ही सर्वश्रेष्ठ न्याय देवता आहे. ती सूरासूरशिरोरत्ना आहे. ती प्रचण्डदैत्यदर्पघ्ना आहे. ईश्वरी सर्व सत्ता आहे. ती हृदयरथ आहे. अंतर्बाह्य आसुरी वृत्तींचा ती अहर्निश नाश करीतच असते. असुरांचा नव्हे तर आसुरी वृत्तींचा ती नाश करते हे तत्व जाणून घेतले पाहिजे. म्हणून ती मोह महिषासुराचा नाश करण्यास कालत्रयातील सिद्धच आहे.

सत् प्रवृत्त समाजाने विशेषत: युवा पिढीने साधनेकडे वळावे. शरीर संपदा ही दैवी संपदा आहे. कायिक, वाचिक व मानसिक तपाने साधना करावी. मन इंद्रियनिग्रह साधून आत्मशुद्ध करावे. अष्टांग योगातले यम व नियमांचे महत्व ओळखावे. यम व नियमांचा पायाच सुदृढ नसेल तर त्यावर धारणा ध्यानाची इमारत कशी बांधणार ? साधना प्रापंचिकांनीही करावी. गणेशअथर्वशीर्ष, विष्णुसहस्त्रनाम, ललितासहस्त्रनाम आदि स्त्रोत्रांचा नित्य पाठ करावा. गायत्री जप करावा. जगन्माता ईश्वरी या शरीरातच आहे याचा अनुभव घ्यावा.

विश्वेश्वरीने या विश्वाचा प्रपंच मांडला तो शिवत्वाचे अधिष्ठान ठेवून त्यावर मांगल्याचा कलशही ठेवला. तीच सप्तलोकी दुर्गेतील महादेवी. हीच दैवी संपदेची आद्य स्फुलिंगीनी.

'द' एव 'ई' द म्हणजे मांगल्य ई हे सौभाग्य. देवि हे मांगल्य व सौभाग्यदायी मातृस्वरूप आहे. 'ए' हे सर्वार्थ साधक आहे. 'व' हे 'ऊ अ' युक्त आहे. स्वप्न व जागृती म्हणजे 'ऊ अ' जागृती स्वप्नावस्थेत सर्वार्थ मांगल्या देणारी देवी हीच दैवी संपदेचे सुमूर्तस्वरूप आहे.

ती ज्ञानीयांची चेतना आहे. ती अभय देणारी आहे. ती शुद्ध मती देणारी आहे. सर्वमंगल आहे. शिवा आहे. सर्वार्थसाधक आहे. तिलाच शरण जावे. ती सर्वस्वरूप आहे. सर्वशक्तीशाली आहे. ती सर्व भवरोगाचा नाश करून श्रेयपद देते. अविद्येची बाधा जाऊन तिच्यामुळेच बुद्धि स्थिर होते.

हे खरे तर सप्तश्लोकी दुर्गेचे रूपांतर. हे सात श्लोक दुर्गा सप्तशतीच्या तेरा अध्यायांचे सार आहे. मधुकैटभ हा कामासुर आहे. शुंभ निशुंभ हे आलस्य आहे. महिषासुर हा मोह आहे. महालक्ष्मी हे बलदायी वीर्यदायी मातेचे स्वरूप.

जीवनांत धर्म अर्थ व काम देऊन मोक्षाकडे नेणारी ही महन्मंगल माता आहे. या दिव्य सप्तश्लोकीची उपासना करून जीवन मंगल करावे व दैवी संपदेचे स्वामी व्हावे.

अष्टभूजा देवीने धारण केलेली अस्त्रे ही देखील आसुरी वृत्तींचा नाश करतात हे महत्वाचे. अस्वाक्षरांच्या मंत्राने अविद्या नष्ट होते. ब्रह्माणी या पुनित मंत्रांनी मन पवित्र करते. अस्त्रांनी ती त्रिगुणांचे शयन करते. गदेने मंगल विद्या देते. बाणाने सौभाग्य. वज्राने ऐश्वर्य. चक्राने कामपूर्ती. शक्तीने प्रपंच.

**राबस्वरूप पाशाढ्या क्रोधाकाराड कुशोज्ज्वला**
**मनोरूपेक्षु कोदण्डा पञ्चतन्मात्र सायका ।**

- ललितासहस्त्रनाम

तेजोनिधी माता दैत्यांचे तेज हनन करते. त्यांना बलहीन करते. निर्बल असुर आपोआपच नष्ट होतो. अमृतमंथनाच्या प्रसंगी अमृत कलश घेऊन लक्ष्मी प्रकट होते. असुरांना मोहित करते व त्यामुळेच तेजोहीन करते. देव सहजी विजयी होतात. श्रीकृष्णानेही गीतेत अशा असुरांना मी **'क्षिपाम्यजस्त्रम-शुभानासुरीष्वेव योनिषु'** फेकून देतो असे सांगितले आहे. जशी ज्याची निष्ठा असेल तसे फळ त्याला प्राप्त होते. जीवन असे पर्यंत या असुरी प्रवृत्तींपासून लांब राहून मन सत्प्रवृत्त होण्यासाठी झटत रहावे. सप्तश्लोकीची ही साधना करून दैवी संपदेचे अधिकारी व्हावे. मृत्युनंतर देह नाश होतो व मन नवीन देह धारण करतो. तो कुठला असावा हे मनाच्या संस्कारावर अवलंबून आहे. सत्वबल असेल तर पुन: पुन: जीवनी यावे व या दैवी संपदेचे उपभोक्ते व्हावे.

**मोघाशा मोघकर्माणी मोघज्ञाना विचेतस: ।**
**राक्षसांमासुरी चैव प्रकृति मोहिनी श्रिता: ॥**
**महात्मानस्तु मां पार्थ दैवी प्रकृतिमाश्रिता ।**
**मजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययमऊ ॥**

जीवन हे प्रकृतीमय आहे परंतु राक्षसी वृत्तीचे लोक तमोगुणी प्रकृती आधीन होतात व महात्मे दैवी प्रकृतीचे उपासक होतात. प्रेय आणि श्रेय या दोन मार्गांपैकी तुम्ही कुठला मार्ग स्वीकारणार ? तुमचे भविष्य त्या संकल्पावर अवलंबून आहे.

# साईवंदना

## साई तुझ्यासाठी

साई तुझ्यासाठी
लाभावी उसंत
नसे कुणा खंत
कशाचीही ।

नाही तुझे भक्त
कपाळ करंटे
करिती ना तंटे
आपसात ।

श्रद्धा सबुरीचा
आम्हा अभिमान
एकतेची खाण
अंतरात ।

मुखी तुझे नाम
ममत्वाची भाषा
ठेविती मनिषा
दर्शनाची ।

**रमेश डी. चव्हाण**
साईनिकेतन नवापूर, जि. धुळे

## भक्त निवास

भक्तांसाठी बांधियले भक्त-निवास ।
भक्तिभावे पाळा तेथील सर्व नियमास ॥


वाटते इथे छोटी बसली आहे नगरी ।
हिरवळी गालीच्याने तिला आहे गुंफली ॥
येती नामवंत, कलावंत, थोर लहान ।
त्या सर्वांनी असती बाबा महान ।

नाही उरे तेथे कसला भेदभाव ।
भक्तीत रंगुनि जाती रंक आणि राव ।
दिव्यांची रोषणाई मना देई उल्हास ।
महाली पसरला अगरबत्तीचा सुवास ॥

वाट दाखवाया सुसज्य ती गाडी ।
भक्तांना भक्तीच्या निवासात धाडी ॥

पवित्रता तेथील राखा तुम्ही ध्यानी ।
पावन साईनाम आठवुनि मनी ॥

**सौ. रंजना कृष्णराव पवार**
गोरेगाव (प.),
मुंबई.



## साईंची द्वारका

तुझ्या द्वारकेला नाही कळस सोनियाचा
इथे दरवळे रे गंध, भक्तिसुमनांचा ॥१॥

तुझ्या द्वारकेत नाही सोनियाचे द्वार
मुक्त चाललाहे येथे, मुक्तीचा व्यापार ॥२॥

तुझ्या शिरी बांधलेली, चिंधी द्रौपदीची
तयामध्ये साठलिरे माया त्रिलोक्याची ॥३॥

उघडी सताडसारी, द्वारे द्वारकेची
जिथे तिथे भरली रे तळी अमृताची ॥४॥

तुझ्या द्वारकेत नाही सोनियाचा साठा
केल्या भक्तालागी साऱ्या, स्वर्गाच्या वाटा ॥५॥

तुझ्या द्वारकेत नाही झगमगाट थाट
भक्तालागी मांडशी रे, चंदनाचा पाट ॥६॥

तुझ्या द्वारकेची वाट, वैकुंठीस जाते ।
वाटेवरी गाती भक्त, श्रद्धा सबुरीची गीते ॥७॥


तुझ्या द्वारकेचा तूच, शोभतोस राणा
भक्तामुखी घालशी रे मोतियाचा दाणा ॥८॥

तुझ्या द्वारकेची शोभा, त्रिभुवनी नाही
भक्तांसाठी येथे नांदे, विश्वव्यापी साई ॥९॥

तुझ्या द्वारकेत झाला भक्तीचा सुकाळ
जीव शिव एक होती, येता अंतकाळ ॥१०॥

साई साई नित्य गाई बोबडी ही वाणी
'गजानना' सांभाळी रे आता चक्रपाणी ॥११॥

**ग. के. कुलकर्णी**
वरची गल्ली, रत्नागिरी



## किती तरी दिवस मला

किती तरी दिवस मला चरण न दिसले
गुरुराज आपुले आज अचानक दर्शन हे घडले ॥धृ॥

हे रूप मनोहर मनी साठवून होतो
तुमचेच गीत मी दिवसारात्री गातो
नव चैतन्यानी जीवन वैभव अखंड दरवळले ॥१॥

माझ्यावर पडता प्रसन्न अपुली दृष्टी
मज भिजवी करूनी अमृतमय ही वृष्टी
सारेच अकल्पित घडता माझे काळिज थरथरले ॥२॥

मज आश्रय द्यावा अपुल्या चरणापाशी
सेवेत राहुद्या भक्ती ही अविनाशी
पाठीवर ठेवा हस्तकमल क्षण मन हे आसुसले ॥३॥

**गिरीबाल**
विश्रामबाग, सांगली



## श्री साईस्तुति सुमन

ओम साई, ओम साई वाचे जपता ।
तन-मन फुलते जाते चिंता ।। १।।

शिरडी क्षेत्री जे जन जमती ।
अखंड "साई-साई" गजर करती ।।२।।

साई-साई गजरा सांगे, द्वारकामाई घुमते ।
नाद ब्रह्माने त्या साईमूर्ती हसते ।।३।।

प्रसन्न त्या दर्शने, देहभान हरपते ।
हरते दुःख वेदना, भवभय हरते ।।४।।

चिंता साऱ्या दुर सारुनिया ।
बाबांच्या दर्शना जाऊ या ।।५।।

जाती वर्ण भाषा भेद विसरुनिया बाबांसी
वंदन करुनिया ।।६।।

आपण सारे एक मुखाने ।
करु या "ओम साई" गजर ।।७।।

ओम साई । ओम साई । ओम साई ।

**सुधा ना. चव्हाण**
आनंद भुवन, टायकलवाडी,
माहिम, मुंबई - ४०० ०१६.

## साईभक्ती गंगा

साई पांडुरंगा
येई माझ्या अंगा
तुझी भक्ती गंगा
येऊ दे अभंगा ।।१।।

शिर्डी बाग फुलली
संत झाले माळी
साई देता तू गा
भक्ती फळ दे गा
तुझी भक्ती गंगा
येऊ दे अभंगा ।।२।।

जोगवा मी मागी
साई चरणी सांगी
श्रद्धा सबुरी धागा
साई चरणी मागा
तुझी भक्ती गंगा
येऊ दे अभंगा ।।३।।

साई नाम मणी
ओवीत बसूनी
माझी गीत वाणी
साई तुझ्या चरणी
धर्म सांगे जगा
हाची सुख भोगा
तुझी भक्ती गंगा
येऊ दे अभंगा ।।४।।

**धर्माजी मोतीराम पाटील**
गडब पुणे-रायगड.



## साई चरणार्पण

हे गीत तव चरणी
वाहते साईबाबा
शब्द गौण असती
भाव खोल गहीरा ॥१॥

शब्दातूनी माझ्या मी
कथिल्या अनंत व्यथा
जाणूनी तूच घेई
भावार्थ अंतीराचा ॥२॥

हे गीत एक वेडे
लय ताल ना सुरांचे
तू जाणतोस सगळे
संदर्भ त्या सुरांचे ॥३॥

भाव वेड्यां सुरांचे
ध्वनी आणि भाववेडे
झंकार नाद वलये
गातात साई गीते ॥४॥

**सौ. शकुंतला शंकर जगतकर**
१९/१६१ उन्नत नगर २
गोरेगाव (प.) मुंबई ६२.



## असा माझा साई

साई सागर प्रेमाचा
साई पतन पापांचा

साई समर्थ सकलांचा
साई कल्याण कुलांचा

साई मनुष्य अवतारी
साई अनाथांचा कैवारी

साई भक्तांच्या अंतरी
साई नांदतसे घरोघरी

**कु. संजय हरिश्चंद्र खळे**
दापोली.

## आलो मी मंदिरात साई

आलो मी मंदिरात साई
फार दिसांचा चुकला-मुकला ॥

लावून घे साई पायी तुझ्या रे
पतित पावन नाव तुझे रे ॥

गाती सारे गुण-गान तुझे रे ।
मला असा का फिरवशी दाता ॥

न मागू पैसा न मागू सत्ता
मागू न माया न मांगू काही ॥
मागू मी मागू दर्शन साई
आलो मी मंदिरात साई ॥

**मोहन सोनवणे (साईकृपा)**
मु. पो. पिंपळनेर,
ता. साक्री, जि. धुळे

## द्वारकामाई

साई सर्वांची आई माऊली
द्वार खुले ठेवूनी बसली
आपल्या लेकूर बाळांसाठी माई ॥१॥

शिळेवर बसूनी साईमाई
उधळी प्रेम वर्षाव भक्तांवर
साई-माऊली आपल्या प्रेमळ
हस्तस्पर्शाने हरून घेई
दिन दुबळ्यांचे दुःख ॥२॥

साईच्या द्वारी कोणीही यावे
श्रीमंत असे वा गरीब दुजा नाही कोणी
द्वारकामाईत नसे भेद नसे भाव
साई-माईला सारी लेकर समान ॥३॥
द्वारकामाईला जो कोणी येई ती
साई माऊलीच्या कृपादृष्टीने होई पुनित
द्वारकामाईत न्हावून निधी भक्तगण
साई स्तुतीत, भजन किर्तनाचा तालात
तर कधी, मग्न होई, पुजा-अर्चात ॥४॥

सांज समयी साई दिप लावूनी
उजळून टाकी द्वारकामाई
असा रोजा दिवाळी दसरा
दिप लावून दिपोत्सव साजरा करी साई ॥५॥

**अनिल महादेव कापकर**
६३-६४ गोपी टँक ट्रांझिट कॅम्प
एल. जे. क्रॉस रोड, माटुंगा (प.), मुंबई ४०० ०१६.

## तुम्ही साईबाबा

तुम्हा पाहतो दत्तरुपात बाबा
कृपा दृष्टी आम्हावरी राहू दे।
तुझ्या दर्शनाची असे ओढ आम्हा
तुजी मूर्ति साकार ही पाहू दे ॥धृ॥

तुझ्या चिन्तताने मिळावी आम्हाला
सुखी जीवनाची अशी सांगता।
तुझे नाव बाबा परीसापरी ते
सुवर्णा परी जीवना पूर्तता ।१॥

घडावी तुझी नित्य सेवा जनीया
सदा चिन्तनी जीव माझा जडो।
दुजा न कुणी साईबाबा आम्हाला
दुजे काही आम्हा मुळी नावडो ॥२॥

तुझे बोल कानी तुझे रुप ध्यानी
तुझी सावली नित्य डोईवरी।
जगी एक आम्हास त्राता विधाता
अशा एक तू माय बापापरी ॥३॥

तुला वंदुनी साईबाबा असा मी
तुझ्या भक्तीचा घेतला हा वसा।
तुझे बोल चारित्र्य सारे तुझे हे
असो जीवनी एक त्याचा ठसा ॥४॥

तुझे कार्य चालू असे हे सदाचे
नसे संपलेले कधी हे जनी।
तुझी मूर्ती राहो सदा अन्तरी या
तुझे बोल हे अमृताचे मनी ॥५॥

सदा वादळी सागरी या भवाच्या
दिलासा तू एक नावे परी
गुणा काय साईबाबा
जनी एक तू कल्पवृक्षापरी ॥६॥

तुझा एक आधार या जीवनाला
तुझे बोल हे अमृताचे परी।
परी नम्र माथा तुझ्या ठेवलेला।
कृपेची तुझी शाल देहावरी ॥७॥

तुझी लीला ना कळे मानवाला
तुझ्या ना परी साईबाबा कुणी।
तू जाण आम्हा दिली साईबाबा।
जनी उच्च वा नीच नाही कुणी ॥८॥

ना लोभ, ना राग, ना दंभ काही
तुझ्या जीवनाचा असा हा ठसा।
स्मृतीने तुझ्या सार्थकी जीव बाबा
असा घेतला वेगळा वारसा ॥९॥

**प्रा. जयंत ललित**
बोरिवली (प.) मुंबई.

## ॥ साई दयेचा सागर ॥

तुझे चांदण्यांचे पाय। माझी कोमेजली फूलें
वाहूं कशी दयाधना। मनी घालमेल झुलें ॥
मनी घालमेल झुले। तुझे फुलांचे सदन।
माझ्या फाटक्या झोळीत। तुझ्या भक्तीचे देदान ॥
तुझ्या भक्तीचे दे दान। नेत्री आसवे आटली।
साई दयेचा सागरा। ओठी तहान दाटली ॥
ओठी तहान दाटली। ऊरी वेदना विखार।
एकदा तू घाल साई। तुझी अमृत फुंकर ॥
तुझी अमृत फुंकर। तूं रे दयावंत फार।
तुझ्या एका कटाक्षाने। जळो दंभ अहंकार ॥
जळो दंभ अहंकार। गर्व द्वेष व्हावा भंग।
दिनरात ओठी राहो। साई साई हा अभंग ॥
साई साई हा अभंग। गाता दंग होई मन।
साई तुझ्या आरतीला। लोचनांचे निरांजन ॥

■ प्रिया पोतदार

ग्रंथपरिचय


## श्रीसाईंचे अंतरंग दर्शन

# "असे होते आमचे बाबा !"

## श्री साईबाबांच्या ११ गुणरत्नांचे रसाळ वर्णन

साईचरणकण

कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर उर्फ हेमाडपंत यांच्या श्रीसाईसच्चरितावरील गद्य भाष्य टीका, अर्थात 'श्रीसाईंचे सत्यचरित्र' हा श्रीसाई-सच्चरितातील प्रत्येक ओवीचा अर्थ उदाहरणांसह नीट समजावून देणारा, सुमारे ७०० पृष्ठांचा ग्रंथ लिहिणारे ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त) हे साईसाहित्यवाचकांना अगदी परिचित आहेत. ऋणानुबंधाच्या गाठी असतील तर अनुभवाने संबंध येतो; व अंतरंगाची निखळ ओळख झाल्यावर तो संबंध दृढ होतो, याचा प्रत्यय श्री. निंबाळकरांना आला; आणि त्यांचं सारं जीवन साईमय झालं. सैन्यातील व्यक्ती धार्मिक वृत्तीची असणं तसं असंभवच, अशी सर्वसाधारण समजुत आहे. परंतु श्री. निंबाळकर याला अपवाद आहेत. त्यांचं विविध धार्मिक ग्रंथांवरील वाचन इतकं सखोल आहे की श्रीसाईंचं जीवन व त्यांची शिकवण समजाविताना ते अन्य धार्मिक ग्रंथांतील दाखले उद्धरणांसह सहज देतात. श्रीसाईंचं जीवन व त्यांची शिकवण व्यासंगी अध्ययनांनी जी आपल्याला कळली ती इतरांना समजावून देण्याचं त्यांनी घेतलेलं व्रत वयाची पंच्याहत्तर वर्षे उलटली असताना आजही तसंच अव्याहत चालू आहे. त्यांच्या मनाचा, मुखाचा, आचरणाचा प्रत्येक क्षण श्रीसाईंच्या शिकवणुकीने प्रभावित असल्याचा अनुभव त्यांचा निकट सहवास लाभलेल्या अनेक व्यक्तींनी घेतला आहे. श्रीसाईंचा ध्यास त्यांना इतका लागला की श्रीसाईसंबंधाने उपलब्ध माहिती बारकाईने जाणून घेण्याचा त्यांनी महत्प्रयास केला; आणि उमगू लागलं की श्रीसाईबाबांच्या स्वभावाचा प्रत्येक पैलू काहीतरी बोध करीत आहे. आपल्याला याद्वारे जे कळलं ते इतरांना माहीत करून द्यावं म्हणून त्यांनी ते शब्दबद्ध केलं; आणि साकारलं श्रीसाईबाबांच्या ११ गुणरत्नांचं रसाळ वर्णन करणारं अनोखं पुस्तक "असे होते आमचे बाबा !" आकर्षक मुखपृष्ठ, सुरेख अक्षरजुळणी, उत्कृष्ट छपाई, सुंदर सजावट, टिकाऊ बांधणी या तांत्रिक दृष्टींनी पुस्तक लोभसवाणे झाले आहे. साईभक्तालाआपल्या सदावाचनात असं पुस्तक असावं असंच वाटेल असं हे पुस्तक आहे.




पुस्तकाचे नाव: **"असे होते आमचे बाबा !"**
लेखक : **ले. कर्नल मु. ब. निंबाळकर** (निवृत्त)
प्रकाशक : **श्रीसाईसागर प्रकाशन**
विठ्ठलवाडी रोड,
पुणे - ३०.
पृष्ठे : ८७
मूल्य : रु. ३५

ग्रंथपरिचय

# जीवनसाधना : शाश्वत हिताचा विचार

डॉ. ग. प्र. परांजपे

विश्वव्यापी कीर्ती लाभलेले जे काही ग्रंथ जगात आहेत त्यात श्रीमद्‌भगवतगीता या भारतीय तत्त्वज्ञानाच्या ग्रंथाचे स्थान अग्रक्रमानेच मांडावे लागेल. लो. टिळकांनी हिला संस्कृत वाङ्मयातला हिरा म्हणून संबोधले आहे तर श्री ज्ञानेश्वरांनी ती भगवंतांची 'वाङ्मयमूर्ती' आहे असे म्हटले आहे. विश्वातल्या सर्वच भाषांमध्ये गीता पोचलेली आहे. सर्व धर्मातील धुरीणांनी गीताभ्यासाचे महत्त्व मानलेले आहे, याचे कारण गीता जीवनाला यथार्थ मार्गदर्शन करते. मानवी जीवनाचे शाश्वत कल्याण करून देणारी आहे.

भारतीय संस्कृतीने तिच्या वेदादिधर्मग्रंथात कधीही भारतापुरता विचार केलेला दिसत नाही तर संपूर्ण मानवजातीचा विचार ती करते. गीताही तशीच म्हणून ती 'नित्यनूतन' तत्त्व ठरते !

### पूर्वग्रहरहित अभ्यास

यासाठी गीताभ्यासाची पद्धतीही नि:पक्षपाती असली पाहिजे. पंथोपपंथांच्या पूर्वग्रहाधारे तिचा अभ्यास करणाऱ्यांना तीत विशेष काही लाभणार नाही. आज वैज्ञानिक प्रगतीचे महात्म्य मानले जाते. पण ती प्रगती व्यक्तीला शांतीचा लाभ करून देणारी नाही. हे येथे गीताभ्यासाने कळून येणार आहे.मात्र तो अभ्यास मानवी जीवनाच्या शाश्वत मूल्यांच्या संदर्भात निरपेक्षपणे केलेला असला पाहिजे.

प्राचार्य आठवले लिखित **'जीवन साधना'** हा अठराव्या अध्यायावरील विवेचनपूर्ण ग्रंथ यथार्थ अभ्यासाचा परिचायक असून शाश्वत मूल्यांच्या 'विचाराच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरणारा' आहे. राधादामोदर प्रकाशनाचे त्यासाठी अभिनंदन केले पाहिजे ! ग्रंथाच्या प्रारंभीच ते म्हणतात की, 'गीतेचे' सगळे तात्पर्य-सार-मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनासाठी जे जे आवश्यक, चारी पुरुषार्थ प्राप्तीच्या दृष्टीने साधन म्हणून जे जे महत्त्वाचे ते सर्व गीतेत व सूत्ररूपाने १८व्या अध्यायात प्रकटले आहे.' (पृ. १)

### इन्सेन्टिव्ह आणि कर्तव्यकर्म

'त्याग आणि संन्यास यांचे स्वरूप यथार्थपणे समजून घेण्याच्या विषयापासून या अध्यायाला प्रारंभ होतो. सकाम कर्माचा त्याग म्हणजे संन्यास व कर्मफलत्याग म्हणजे त्याग' असा समग्र विचार प्राचार्यांनी पातिव्रत्याच्या-पतिव्रतेच्या उदाहरणाने सोपा करून सांगितला आहे. सकाम कर्माचा त्याग याचे त्यांचे सोदाहरण विवेचन रंजक झालेले आहे. सत्वरजतमादि गुणांचे वर्णन त्यागाच्या या प्रकरणात फार चांगले झाले आहे. काम क्लेष भयाने मनुष्ये कर्मे टाकतो या संदर्भात मनाच्या पातळीवरचे दु:ख ही माणसाला कर्तव्य विन्मुख होण्यास कसे कारणीभूत होते ते व्यक्त करताना म्हणतात, 'अपेक्षित कौतुक होत नाही, तुच्छता, उपेक्षा, आरोप, निंदा इ. गोष्टी ज्या अधिक प्रमाणात माणसाच्या वाट्याला येतात, मग तो म्हणतो, 'नकोच ना हे काम !' असे म्हणून तो मागे सरतो. कर्तव्य असे सोडून देणे हा रजोगुणच आहे.' (पृ. २४) सामाजिक कार्यकर्त्यांच्या बाबतीत हे पुष्कळदा अनुभवास येते या दृष्टीने हा ऊहापोह आवश्यक नि उपयुक्त वाटतो. कर्माविषयीआसक्ती नसणे आणि फलाविषयी आसक्ती नसणे केवळ आवश्यक म्हणून कर्तव्य-कर्म होणे हाच सात्विक त्याग गीतेने सांगितला. याच संदर्भात शेतकऱ्याच्या काळ्या आईचे उदाहरण मोठे मार्मिक झालेले आहे. (पृ. २९)

पाप-पुण्य मनुष्यकल्पित आहे तर मग त्यांचा स्वर्ग आणि पुनर्जन्माशी संबंध कसा येतो, असा प्रश्न विचारला जातो. याचे सुंदर स्पष्टीकरण प्राचार्यांनी येथे केलेले आहे.पाप-पुण्यात्मक कृत्यांच्या मागच्या प्रेरणा कामक्रोधातून निर्माण झालेल्या असतात. मनुष्य भोगात परतंत्र असला तरी कर्मात स्वतंत्र असतो. कार्यामागचे कारण शोधण्याची जिज्ञासा-बुद्धी फक्त माणसालाच असते. विज्ञानाची प्रगती यामुळेच साधली असे सांगूत ने म्हणतात, 'कार्यामागचा कारण शोध भौतिकाच्या दिशेने जातो तेव्हा त्यातून संशोधकशास्त्रज्ञ जन्मतात त्यामुळे सुख-साधनांची निर्मिती होते तर तो जेव्हा अध्यात्माच्या दिशेने जातो तेव्हा संत-सत्पुरुष जन्माला येतात व त्यामुळे शांतिसमाधानाची निर्मिती होते. यामध्ये विकृती झाली की भौतिकात शोषण, अस्वास्थ्य, संघर्ष निर्माण होतात तर अध्यात्मात वंचना, दंभ, आक्रमक अश्रद्धा यांची वाढ होते.' (पृ. ४६) पापपुण्याच्या संदर्भातले हे विवेचन परिणामकारक झालेले आहे. प्रयत्नवाद आणि दैव यांचेही विश्लेषण येथे (पृ. ५३ ते ५९) आलेले आहे.

'मुक्त सङ्गोऽनहंवादी' अशा सात्विक कर्त्याचे विवरण गीतेने प्रभावीपणे मांडले आहे.हा सात्विककर्ता निरहंकारी असतो, निष्क्रिय नसतो. अपयशाने खचत नाही पण यशाने 'चढेल' होत नाही, त्याला नैराश्य येत नाही - त्याचे प्रयत्न थांबत नाहीत. त्याचे धृति-उत्साह टिकून कसे रहातात, याचे सुरेख स्पष्टीकरण प्राचार्यांनी केलेले आहे. अतिशय मार्मिक दृष्टान्त त्यासाठी वापरले

आहेत. 'इन्सेन्टिव्ह' असेल तरच काम करणाऱ्यांनी याचा विचार जरूर करावा. ओव्हरटाईम काम करणाऱ्यांना येथे फटकारलेलेही दिसते. (पृ. ९०-९१ गीता 'माऊली' खाऊ देण्याबरोबर फटकारण्याचाही तिचा अधिकार !) या संदर्भात वाचस्पती मिश्र व पत्नी भामती, बाजीप्रभु देशपांडे, ऐझक न्यूटन अशा पूर्णत: वेगवेगळ्या क्षेत्रातल्या श्रेष्ठ मंडळींची उदाहरणे त्यासाठी दिलेली आहेत. म्हणून ते म्हणतात, 'सामाजिक, विशेषत: देशकार्य करणाऱ्याने तर हा श्लोक (गी. १८-२६) अंत:करणावर कोरून ठेवावा इतका महत्त्वाचा आहे.' (पृ. ९३)

### स्वभावजकर्मे – प्रकट चिंतन

चातुर्वर्णांची स्वभावज कर्मे स्पष्ट करताना आजच्या परिस्थितीचा त्यांनी घेतलेला आढावा (पृ. १३५) चिंतनीय झालेला आहे. 'प्रज्ञाहतास्तु सुहता भवन्ती' अशा शब्दात त्यांनी भारतीयांचे मनोदास्य वर्णन केलेले आहे. त्याकरीता व्हॅलेंटाईन चिरोल व मॅक्समुल्लर यांची कुटिल नीती उघड करून दाखविली आहे. (पृ. १३६) इंगजी माध्यमाच्या आकर्षणाबद्दलही त्यांनी खंत व्यक्त केली आहे. (तत्रैव) काही जाणती-चांगली माणसेही जेव्हा 'ब्राह्मण्याशी आमचे भांडण आहे' म्हणतात तेव्हा प्राचार्यांना त्याचे अतीव दु:ख होते.रोहिदास चांभाराचा कथाभाग त्यांनी या संदर्भात दिला आहे (१३७) तो मार्मिक आहे. जाणत्यांनीही अधिक साक्षेपीपणाने भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्याची आवश्यकता असल्याचे येथे जाणवते.

विकृत इतिहासलेखनाचा परामर्शही श्री. अनंतरावांनी घेतलेला आहे (१३७ ते १४०) इतिहासाच्या अनेक सोनेरी पानांचा उल्लेख करून 'धम्मपदा'चा (रविंद्रनाथ टागोर) पाश्चात्यांच्या कसोट्यांवर भारतीय इतिहास तपासून पहाणे चूक असल्याचे निर्वाळा दिलेला आहे. एवढेच नव्हे तर भारतीय दृष्टिकोनाचे विवरणही केलेले आहे.

सारांश, सद्यस्थितीत अत्यंत नाजुक बनलेल्या चातुर्वर्ण्यासारख्या विषयातही त्यांनी केलेलें प्रकट चिंतन परिणामकारक झालेले आहे यात शंका नाही.

### जीवो ब्रह्मैव :

गीतेने वर्णिलेले स्थितप्रज्ञ (अ. २) कर्मयोगी (अ. ३), भक्त (अ. ९), ज्ञानी (अ. १३) आणि त्रिगुणातीत पुरुष (अ. ५, ६), दैवी संपत्तीचा पुरुष (अ. १६) आणि त्रिगुणातीत (अ. १४) या सर्वांचे संदर्भ सात्विक कर्ता, सात्विक बुद्धी, धृती इच्छा इ.च्या संदर्भात या अध्यायात येऊन गेलेल `आहेत. ब्रह्म होण्याची योग्यता माणसाला प्राप्त होते याचे विवेचन करताना असे अनेक संदर्भ त्यांनी दिलेले आहेत. (पृ. १९४-९५) उपासना वा साधना म्हणून भक्तीचा विचार फार महत्त्वाचा ठरतो. भक्ती हा पंचम पुरुषार्थ असल्याने त्याचेही सुंदर विवरण श्री. आठवले यांनी केले आहे (पृ. २०८). यासाठी अवस्था क्रमाचा विचारही 'क्रमयोग' म्हणून त्यांनी मांडलेला आहे (२११) कबीरांच्या पदामुळे या विवरणाला वेगळाच उठाव आला आहे. श्री ज्ञानेश्वरांच्या उपासना कांडाचा परामर्श येथे अतिशय भावगर्भतेने घेतलेला आहे. ही भक्तीचीच परिणती ! 'जीवन साधना' ग्रंथही 'जीवन'ची म्हणजेच 'जीवो ब्रह्मैव'ची साधना आहे हे 'प्रकाशकीय वचन' (पृ. २) योग्य आहे.

साऱ्या गीतेची परिणती शेवटी 'ज्ञानादेवतु कैवल्यम्' अशी ज्ञान-भक्तीत झालेली आहे. भगवंताशी होणाऱ्या ऐक्यभावाच्या आहे येणारे स्थूल-सूक्ष्म-द्वैताधारी धर्म भगवान् टाकायला सांगतात. या विवरणातही विलक्षण गोडी आहे .'जो चलना राह नाजुक है' या कबीर-पदाच्या साह्याने अतिशय साक्षेपी विवेचन करून गीतेचा मुख्य विषय पूर्ण केला आहे.

### थोर समाज शिक्षक

प्राचार्य आठवले यांची भाषा सोपी आहे, आकर्षक आहे. अनुभूतिजन्य असल्यामुळे भक्तीचा ओलावा त्यातून प्रत्ययाला येतो. संतांच्याजीवनातले हृद्य कथा प्रसंग ते विषय प्रतिपादनाच्या पुष्ट्यर्थ देतात तेव्हा याचा विशेष अनुभव येतो. पौराणिक कथांचे विशेषत: रामायण-भारतातले संदर्भ हे आधुनिक साहित्यिकांच्या अनुचित आक्षेपांच्या खंडनाकरीता दिलेले आहेत.

'यत्र, योगेश्वरो कृष्ण:....' या समारोपाच्या विवेचनात प्राचार्यांच्या देशभक्तीने परिपूरित हृदयाचे दर्शन घडते. हिंदू संस्कृतीचा सार्थ अभिमान व्यक्त करताना त्यांनी 'गांधींचा राम, फ्रॉईडचा काम आणि मार्क्सचा दाम (अर्थ)' यांची जी चिरफाड केलेली आहे ती त्यांच्या विलक्षण भाषा प्रभुत्वाचा पुरावाच आहे. (पृ. २७९-८०) ज्याला आपण Terseness म्हणतो त्याचे ते मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांच्या लेखनाला सुंदरशी विनोदाची झालरही (पृ. ९४) असल्याने ते रोचक झालेले आहे. विज्ञानाचे वावडे त्यांना नाही त्यामुळे विज्ञानांच्या दृष्टांतांनीही त्यांनी आपले विवेचन हृदयंगम केले आहे.

सूक्ष्म विवेचक शक्ती आणि आर्जवपूर्ण युक्तिवाद यांचा मनोज्ञ संगम या ग्रंथात झालेला आहे. एका निष्णात समाजशिक्षकाची भूमिका या ग्रंथाच्या रूपाने प्रा. आठवले यांनी बजावली आहे. जीवनाचे शाश्वत हित साधणे हाच संतांच्या वाङ्मयनिर्मितीचा हेतू असतो, तो येथेही सिद्ध झालेला आहे.

## जीवनसाधना

लेखक : प्राचार्य अ. दा. आठवले

प्रकाशक : राधादामोदर प्रतिष्ठान

'प्रतीक', ४०३/१ शनवार पेठ, पुणे - ३०.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिरडी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

# साईभक्तांना आवाहन

प्रिय साईभक्तांनो !
सप्रेम नमस्कार,

आपण 'श्री साईलीला'चे वाचक आणि वर्गणीदार आहात. 'श्री साईलीला'चे नवे स्वरूप आपण सर्वांनाच आवडले आहे. आपणापैकी तशी पत्रे आम्हाला पाठविली आहेत. त्याबद्दल धन्यवाद !

श्री साईबाबांचे कार्य, त्यांची शिकवण, भक्तांना आलेले त्यांचे अनुभव आणि अध्यात्माचा प्रसार अधिकाधिक लोकांत करणे म्हणजेच साईसेवा आहे. त्यासाठी 'श्री साईलीला' सर्वाधिक लोकांपर्यंत पोहोचावयास हवा. या साईसेवेत आपण वाढ करू शकता !

आपण फक्त पाच वर्गणीदार 'श्री साईलीला'स मिळवून द्यायचे. यामुळे आपल्या हातूनही साईसेवा घडेल आणि श्री साईबाबा आपल्यावर कृपा करतील याची आपणासही कल्पना आहेच.

तरी खालील फॉर्मवर पाच वर्गणीदारांचे पत्ते व प्रत्येकी ५० रु. प्रमाणे एकूण २५० रु. पाठवावे.

कळावे. श्री साईबाबांच्या आशीर्वादासह !

आपला स्नेहांकीत,
**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक
'श्री साईलीला'

- - - - - - - - - - - इथे कापा - - - - - - - - - - -

कार्यकारी संपादक
'श्री साईलीला',
८०४-बी, साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर (पू.),
मुंबई - ४०० ०१४.

यांस,

आपण साईभक्तांना आवाहन केल्याप्रमाणे सोबतच्या जोडलेल्या कागदावर पाच वर्गणीदारांचे पत्ते पाठवीत असून त्यांची प्रत्येक ५० रु. प्रमाणे रु. २५० (एकूण दोनशेपन्नास मात्र) सोबत मनीऑर्डरने/चेकद्वारा/रोख पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रसार करण्याची संधी आपण यानिमित्ते मला देऊन साईसेवा करण्यास उद्युक्त केलेत याबद्दल आभारी आहे. कळावे.

आपला,

नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

(ता. क.: सोबतच्या कागदावर पाच नव्या वर्गणीदारांचे पत्ते जोडले आहेत.)

# गुरुपौर्णिमा उत्सव - क्षणचित्रे




ख्यातनाम गायक पं. प्रभाकर कारेकर यांच्या गायनाने उत्सवास बहार आली!



उत्सवानिमित्त निघणाऱ्या शोभायात्रेतील आनंदोत्सव



उत्सवास लोटलेला साईभगिनींचा सागर




बाबांच्या माध्यान्ह आरतीच्या वेळी जमलेला साईभक्तांचा अलोट समुदाय

(सर्व छायाचित्रे : नितीन मिराणे)

Registered with the Registrar for News-papers of India No. MH/527



चिमटा उचलिला स्वहस्तें... मग तो तेथेंचि मातींत खुपसिला आंतूनि प्रदीप्त निखारा काढिला....




हे बाल फकीर गाडींतूनि उतरले... "या साई" म्हणूनि सामोरे गेले... नाम तें पडलें तेथूनि... ||

नोव्हेंबर - डिसेंबर १९९७

# श्री साईलीला

रु. ८





# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## विश्वस्त मंडळ


श्री. द. म. सुकथनकर
(अध्यक्ष)

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. मोहन मो. जयकर | (सदस्य) | श्री. रायभान ग. चिने | (सदस्य) |
| श्री. रमेश दा. सोनी | (सदस्य) | श्री. भास्कर शं. बोरावके | (सदस्य) |
| श्रीमती रेखा ग. दिघे | (सदस्य) | श्री. अण्णासाहेब सा, म्हस्के पाटील | (सदस्य) |
| श्री. प्रकाश व. कारखानीस | (सदस्य) | श्री. राजीव पुं. रोहोम | (सदस्य) |
| श्री. मुकेश र. पटेल | (सदस्य) | श्री. संभाजी कि. काळे | (सदस्य) |
| श्री. मधुकर द. जोशी | (सदस्य) | श्री. अशोक भि. खांबेकर | (सदस्य) |
| श्री. प्रकाश पी. वैशंपायन | (सदस्य) | सौ. प्रेमाबाई सो. बज | (सदस्य) |
| श्री. मधुकर जे. गर्दे पाटील | (सदस्य) | श्री. रामचंद्र एन. गोस्वामी | (सदस्य) |
| श्री. देवकीनंदन सारस्वत | (सदस्य) | श्री. प्रभाकर तु. बोरावके | (सदस्य) |
| श्री. आप्पासाहेब खं. कोते | (सदस्य) | श्री. सोपान मा. धोर्डे | (सदस्य) |

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

**श्री साईलीला**

वर्ष ७५

**नोव्हेंबर - डिसेंबर १९९७**

: संपादक :
**द. म. सुकथनकर**

: कार्यकारी संपादक :
**विद्याधर ताठे**

**: कार्यालय :**
'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी. : ४१६ ६५ ५६
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८

: मुद्रक :
**गीता ऑफसेट, मुंबई.**

: टाईपसेटींग :
**देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी :
रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखात प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अमृतमहोत्सवी वर्ष
## (१९९७-९८)



## अंतरंग


- ❑ **संपादकीय :** विद्याधर ताठे — २
- ❑ **श्री दत्तगुरु महिमा :** चेतन — ३
- ❑ **सबका मालिक एक :** धर्माजी पाटील — ६
- ❑ **अमृतकलश** — ९
- ❑ **नामजप - एक उर्जा स्रोत :** केशव पटवर्धन — १६
- ❑ **नाचू कीर्तनाचे रंगी :** डॉ. ग. वा. तगारे — १८
- ❑ **सगुण-निर्गुण वाद :** एस. ए. कुलकर्णी — २०
- ❑ **संतकवयित्री अक्कमहादेवी :** सु. ह. जोशी — २३
- ❑ **ज्योत उजळू दे सत्त्वगुणांची :** महादेव साने — २४
- ❑ **साईवंदना (कविता व भक्तीगीते)** — २६
- ❑ **सद्गुरु भक्ती :** कृष्णा तेली — २८
- ❑ **साई अनुभव** — ३०
- ❑ **अभिप्राय :** — ३६


卐卐卐

# संपादकीय

विद्याधर ताटे



**नाना मते नाना पंथे । जरी जगती अस्तित्वात।**
**परि अवघ्याचे सार । एक तूंच अससी की ।।**

**सा**ईबाबांचा अगाध महिमा, त्यांच्या अतर्क्य लीला व त्यांची शिकवण हे आधुनिक मानवधर्माचेच मूर्तीमंत दर्शन आहे. विज्ञानयुगातील संगणक पर्वाने अवघ्या मानवजातीला कधी नव्हे एवढे समीप आणलेले आहे. या संगणक, सॅटेलाईट क्रांतीने देश व धर्माच्या साऱ्या सीमा नष्ट केल्या असून मानवाला खऱ्या अर्थाने विश्वव्यापक केलेले आहे. 'विश्वात्मक माझा स्वामी निवृत्तीराजा' असे आपल्या गुरूचे वर्णन 'विश्वात्मक' विशेषणाने संत ज्ञानदेव महाराज यांनी केलेले आहे. ज्ञानदेवांची ही ७०० वर्षापूर्वीची रचना पाहता ज्ञानदेवांच्या दृष्टीतील द्रष्टता आपणास जाणवते. हीच विश्वात्मक दृष्टी आपणास सर्वच संतांच्या ठायी दिसते.

'सबका मालिक एक' असा संदेश देऊन श्रीसाईबाबांनी सर्वांना आपल्या विश्वात्मकतेचा परिचय करून दिलेला आहे. श्री साईबाबांना अनेक भक्त दत्तावतार मानतात आणि

**तोचि दत्तदेव तू शिरडी राहुनी पावसी ।**
**राहुनि येथे अन्यत्राहि तू भक्तास्तव धावंसी ।**

**कलियुगी अवतार । सगुणंब्रह्म साचार ।**
**अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर**

**जय देव जय देव दत्ता अवधूता साई अवधूता ।**
**जोडुनि कर तव चरणी ठेवितो माथा ।।**

**आ**दी पदांनी साईची आरती करतात. दि. १३ डिसेंबर रोजी दत्तजयंती आहे. त्यानिमित्त शिर्डीत परंपरेनुसार उत्सव साजरा होत असून नोव्हेबर-डिसेंबरच्या या अंकात त्यादृष्टीने काही विषय आम्ही समाविष्ट केलेले आहेत. त्याशिवाय साईभक्तांच्या अनुभवांनाही नेहमीप्रमाणे महत्त्वाचे स्थान आम्ही दिलेले आहे. साईभक्तांनी मोठ्या संख्येने श्री बाबांचे अनुभव पाठवावेत ही विनंती. फक्त हे अनुभव पाठविताना ते वाचता येतील असे कागदाच्या एकाच बाजूस लिहून पाठवावेत तसेच हे लेखन करताना आधुनिक विज्ञानयुगाचाही विचार करून त्याची मांडणी करावी. श्री साईबाबांना अंधश्रद्धां मान्य नव्हती. आपणही अंधश्रद्धेला खतपाणी न घालता आपले लेखन करावे ही विनंती.

**श्री** साईलीला नियतकालिकाचे हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे त्यानिमित्तच्या अमृतकलश स्तंभामध्ये या अंकात आम्ही इ.स. १९२९ च्या अंकातील नाममहिमा आणि न्यू सायकॉलॉजी हा लेख पुनर्मुद्रित केलेला आहे.

**आ**ता यानंतर आपली भेट १९९८ सालातील जानेवारी अंकाद्वारे होईल. याच अंकात आपणास १९९८ च्या नववर्षाच्या सहर्ष शुभेच्छा.

**नूतन वर्ष शुभचिंतन !**

**विद्याधर ताटे**
कार्यकारी संपादक, श्री साईलीला

# श्री दत्तगुरु महिमा

- चेतन



अनंत काळापासून मनुष्य सुखाचा शोध घेत वणवण फिरतो आहे. पण सुख मात्र त्याला हुलकावण्या देतं. क्षणाक्षणाला त्याच्या हातातून निसटतं. या सुखाच्या शोधात माणसानं काय केलं नाही? अहोरात्र कनक आणि कांताच्या मागे तो धावला पण त्याला सुखाचं दर्शन सुद्धा झालं नाही. विज्ञानाच्या प्रगतीनं ऐहिक सुखाच्या राशी मानवासमोर उभ्या केल्या. पण मानव अशांतच.

सुखासाठी वणवण भटकणाऱ्या या मानवाला सुखाचा मूलमंत्र देणारा गुरु जोवर भेटत नाही तोवर त्याची ही तळमळ सुरुच असते. मग त्या व्याकुळ अंतःकरणातून आर्त उद्गार उमटतात.

**तळमळ लागे आता जीवा**
**देई दर्शन गुरुदेवा ॥धृ॥**

**बहुत हिंडलो मी भवताली**
**नाना रूपें तुझी पाहिली**

**परी अंतरी तुझाच ठेवा ॥१॥**
**वनीं हिंडता पानोंपानीं**

**ऐकू येती तुझींच गाणीं**
**भान हरपुनी करितो धावा ॥२॥**

**व्यापुन राहे तुझा नीलिमा**
**तव नामाचा अपूर्व महिमा**

**अमृत सिंचन करि तू देवा !॥३॥**

गुरु भेटल्याशिवाय आपल्याला सुख भेंटणार नाही.शांतीचा मार्ग सापडणार नाही. अशी तळमळ लागलेल्या या आर्तजीवाला शेवटी गुरु भेटतोच भेटतो. आणि मग तो भक्ताच्या अशांत अंतःकरणात शांतीचा ज्ञानदीप प्रज्वलीत करतो.असा हा महागुरु प्रत्यक्ष गुरुतत्वच म्हणजे'अवधुतचिंतन श्री गुरुदेव दत्त! ब्रह्मा, विष्णु, महेश,।उत्पत्ती, स्थिति आणि लय-या तिन्हींचा सुंदर संगम म्हणजे 'दत्तगुरु'.अशा या सद्गुरुला शरण जाणं,त्याला सर्व जिवनच अर्पण करणे, हीच प्रभावी भक्ती.ही भक्तीअंतःकरणातला अंधकार दूर करून, ज्ञानाचा प्रकाश पाजळते आणि भक्तांच्या प्रतीतीचे उद्गार उमटतात.

**तारक जगी या एकच मंत्र**
**''अवधुत चिंतन श्री गुरुदेव दत्त''॥धृ॥**

**परब्रह्म हा दत्तावतार**
**सद्गुरु स्वामी सर्वाधार**

**शरणी जाऊनी, सेवा करुनी**
**होई तू जीवन्मुक्त॥१॥**

**त्रिगुमात्मक ही सुन्दर मूर्ती**
**त्रिखंडात या गाजे कीर्ती**

**अत्रिनंदन, जय करूणाधन**
**जय जय श्री अवधूत ॥२॥**

**महाविष्णुचा हा अवतार**
**विश्वगुरु हा जगदोद्धार**
**काया, वाचा, मनसा निशिदिनी**
**घेई तू आनन्द ॥३॥**

'अवधूत चिन्तन श्रीगुरूदेव दत्त' या तारक मंत्राने पावन झालेल्या भक्ताच्या अंतःकरणात सात्विक भाव दाटून येतो. सती अनुसूयेच्या पोटी जन्माला आलेल्या त्या दिव्यमूर्तीच्या चिंतनाने त्याला दिव्यमूर्तीचा ध्यास त्याला लागतो. ध्यानी मनी त्याला गुरूमूर्तीच दिसू लागते. अखंड चाललेल्या नामजपामुळे त्याच्या हृदयाकाशात आनंदाचे मेघ दाटून येतात आणि या आनंद घनाच्या वर्षावाने धन्य झालेल्या भक्ताचे उद्गार म्हणजे-

**त्रिमूर्तिच्या दिव्यत्वाला**
**नमन करुया श्री दत्ताला ॥धृ॥**

**ब्रम्हा विष्णु आणि महेश्वर**
**अनसूयेचे सुपुत्र सुन्दर**
**त्रिगुणात्मक हे रूप राहिले,**
**व्यापुन या विश्वाला ॥२॥**

**दत्तमंत्र जयघोष करुं या**
**अंतरात या दिपउजळू या**
**त्रिगुणात्मक रुप मनो मंदिरी**
**दिसेल (रे) मनुजाला ॥२॥**

**ध्यानी मनी या गुरूचे चिंतन**
**नामजपाचे अखंड मन्थन**
**आनंदाचे अश्रु दाटती**
**सुखविती, नयनाला ॥३॥**

भक्ताला जाणवलेले हे दिव्यत्व म्हणजे प्रत्यक्ष गुरुतत्त्वच आणि या तत्त्वाचे दर्शन ज्याला झाले त्याला या जीवनात काय कमी ? प्रत्यक्ष कल्पतरूच त्याला भेटला. त्याच्या साऱ्या मनोकामना पूर्ण करणारा कल्पकरू ! तिमिरा कडून प्रकाशाकडे नेणारा, अज्ञानातून ज्ञानाकडे नेणारा, आणि क्षणभंगुरत्वाकडून अमरत्वाकडे नेणारा असा हा कल्पतरू. अशा या गुरुचे चरण कमळ ज्याच्या ध्यानी आहेत त्याला खरोखर काय कमी.

**श्री गुरु माझे कल्पतरू**
**चरण कमल हे नित्य स्मरुं ॥धृ॥**

**कधि संकटे शिरी कोसळती**
**वादळात या मेघ गर्जती**
**अंधाराविण नसे सोबती**
**कुणा पुकारुं ? काय करुं ? ॥१॥**

**मनांत माझ्या विफल वेदना**
**हृदयी जळती व्यथित भावना**
**श्रीदत्ताचे स्पर्शुनि चरणा**
**कलश सुखाचे नित्य भरूं ॥२॥**

**जीवनाच्या कातरवेळी**
**पैलतीरावर नजर लागली**
**'दत्त' गोडी मुखीं आवडी**
**मरणाला मी असे वसूं ॥३॥**

धर्माला जेव्हां जेव्हां ग्लानि येते, धर्माचा उद्धार करण्यासाठी ईश्वरी चैतन्य मानव रुप धारण करतं. असाच एक चमत्कार कारंजा नगरीत झाला. अंबा आणि माधव या सत्वशील दांपत्याच्या घरी एक अदभुत बालक जन्माला आले. हे बालक जन्मले तेच मुळी ओंकाराचा हुंदका देत. जगाला पावन करण्यासाठी झालेला हा नरहरीचा अवतार, म्हणजेच थोर विभूती-नृसिंह सरस्वती. सरस्वती गंगाधरांच्या पवित्र 'गुरु चरित्रात वर्णन केलेल्या या गुरू महिमेमुळे अनेक जण पावन झाले. धन्य ती कारंजा नगरी जिथे प्रत्यक्ष नरहरी अवतरले.

**नरहरीचा झाला अवतार**
**कारंजा नगरी पावन**
**झाली कारंजा नगरी पावन ॥धृ॥**

**जायां पती ते माधव-अंबा**
**पूर्वजन्मीची हीच अंबिका**
**व्रत आचरती शनि**
**प्रदोषे दोघे श्रद्धावान ॥१॥**

**शिवभक्तिची महती न्यारी**
**वांछित फल तो देई पदरी**
**जन्मा आले पुत्र मुहूर्ती,**
**घेऊन शिव वरदान ॥२॥**

**वदे वैखरी श्री ओंकार**
**वसे अंतरी नित झंकार**
**अद्भुत लीला बालक रुपे,**
**मौनवृत्ति परिधान ॥३॥**

दक्षिण प्रांतातल्या भूरिभद्रा या नदीने भगवंताची प्रार्थना करून स्वतःच्या जलाने पापनाश व्हावा असा वर भगवंताकडून मागून घेतला अशी आख्यायिका आहे. या भूरिभद्रा नदीच्या काठी कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमेवर 'अक्कलकोट' हे गांव वसलेले आहे. वारुळातून प्रगट झालेले श्री स्वामी समर्थ दत्तगुरूंचा प्रत्यक्ष अवतार या अक्कलकोट नगरीत वास्तव्याला आले आणि त्या नगरी बरोबरच असंख्य भक्तांचाही भाग्योदय झाला. या सिद्ध अवधूताच्या सेवेने पावन झालेले भक्तगण कृतज्ञतेने श्री स्वामी समर्थांचा जयजयकार करतात.

**प्रकट जाहली वारुळातुनि**
**'श्री गुरु मूर्ति समर्थ ॥धृ॥**

**जन्मशून्य हे दिव्यरूपा !**
**अयोनिज तू नृसिंह स्वरूपा !**
**निजागमन ध्येयार्थ ॥१॥**

**कोटी सूर्यसम प्रभा शोभते**
**मूर्ति अलौकिक नयनी दिसते**
**दिव्य बाहु रक्षणार्थ ॥२॥**

**रौद्ररूप तव हे शिवशंकर**
**दीनांचा तू करुणा सागर**
**दया धर्म शरणार्थ ॥३॥**